सोमवार, 24 ऑक्टोबर 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक -78
Title Code : MAHMAR51117

आधुनिक केसरी

MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● MONDAY 24 OCTOBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-78 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-12 ● PRICE-5

# निर्दयी सरकारकडे भावनांचा दुष्काळ

## उद्धव ठाकरेंचा शिंदे-फडणवीसांवर हल्लाबोल!

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे परतीच्या पावसाने पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या भेटीसाठी आजपासून(रविवार) मराठवाडा दौऱ्यावर आहेत. आज त्यांनी औरंगाबादमधील दहेगावात जाऊन शेतीच्या नुकसानीची पाहणी केली व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवादही साधला. तसेच त्यांनी पेंढापूर येथील शेताच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला. यानंतर आयोजित पत्रकारपरिषदेत बोलताना त्यांनी राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारवर जोरदार टीका केली.**



शेतकऱ्यांवर ज्या आपत्ती येतात त्या दोन प्रकारच्या असतात, एक कोरडा दुष्काळ असतो तर एक अतिवृष्टीची आपत्ती असते. हे आपल्या हातात नसते परंतु ही अस्मानी संकटे आल्यानंतर सरकारचे कर्तव्य असते की शेतकऱ्याला उघड्यावर पडू द्यायचं नाही, त्याचं घरदार उघड्यावर पडता कामानये. परंतु आज एकूणच घोषणांची अतिवृष्टी सुरू आहे आणि अंमलबजावणीच नव्हे तर मी म्हणेण या निर्दयी सरकारकडे भावनांचा दुष्काळ आहे. असे उद्धव ठाकरेंनी म्हटले.

पत्रकारपरिषदेत बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, आजची माझी भेट ही प्रतिकात्मक आहे. एका विचित्र अवस्थेत आपण सर्वजण आहोत. एकाबाजूला दिवाळी सुरू आहे, तर दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांचं दिवाळं निघालेलं आहे. दिवळी साजरी तर सोडून द्या पण दिवाळीत कपडे कोणते घालायचे, घरात अन्न काय शिवजवायचे? हा मोठा प्रश्न आपल्या अन्नदात्याला पडलेला आहे. मी का मुद्दाम आलो. केवळ आज विरोधी पक्षात आहे म्हणून मी आलेलो नाही. तर या शेतकऱ्यांचं ऋण आपल्यावर आहे, नेहमीच असते. महाविकास आघाडीच्या काळात साधरण दोन-अडीच वर्ष करोनाने आपली खाल्ली, सर्वत्र लॉकडाउन असताना, आपल्या अर्थव्यवस्थेला जर कोणी आधार दिला असेल तर आपल्या अन्नदात्याने दिला आहे. कृषी क्षेत्राने दिला आहे कारण तिथे लॉकडाउन करता येणे शक्य नव्हते. जर शेतकरी तेव्हा राबला नसता, तर आपल्या आर्थिक परिस्थितीचे सुद्धा दिवाळे निघाले असते. याशिवाय, पावसाची सुरुवात ही चक्रीवादाळाने होते. त्यानंतर मग संततधार, अतिवृष्टी ढगफुटी होते. मागील आठ-दहा दिवसांपूर्वी पुण्यातही अतोनात पाऊस पडला. रस्ते तुंबले घरात पाणी गेले. पण आपल्या मुख्यमंत्र्यांनी त्यावर उत्तर दिले नाही असा भाग नाही. कारण, त्यांच्याकडे सगळ्या प्रश्नांवर उत्तर आहे, तर त्यांनी उत्तर दिलं की पाऊस किती पडावा हे महापालिका ठरवत नाही. त्याचप्रमाणे ते इथल्याबाबतीतही म्हणतील की शेतात आणि ग्रामीण भागात पाऊस किती पडावा हे सरकारच्या हातात नसते. असेही उद्धव ठाकरेंनी यावेळी म्हणत राज्य सरकारवर टीका केली.

# भारताचा पाकिस्तानवर थरारक विजय; विराट- हार्दिकची अफलातून खेळी


आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** रताचा स्टार फलंदाज विराट कोहली आणि हार्दिक पांड्याच्या आक्रमक खेळीच्या जोरावर अखेरच्या षटकापर्यंत रंगलेल्या थरारक सामन्यात भारतानं पाकिस्तानचा चार विकेट्सनं धुव्वा उडवला. या सामन्यात भारतीय कर्णधार रोहित शर्माने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर युवा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंह आणि स्टार ऑलराऊंडर हार्दिक पांड्याच्या भेदक गोलंदाजी करत कर्णधाराचा निर्णय असल्याचे सिद्ध केले. भारत आणि पाकिस्तान यांच्यात आज पार पडलेला सामना यंदाच्या टी-20 विश्वचषकातील आतापर्यंतच्या सामन्यापैकी सर्वात थरारक सामना असेल. प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानने भारतासमोर 160 धावांचं लक्ष्य ठेवलं होते.

प्रत्युत्तरात भारतीय संघाने चार विकेट्स राखून विजय मिळवला. पाकिस्ताननं दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरुवात खराब झाली. पावर प्लेमध्ये भारताने कर्णधार रोहित शर्मा आणि केएल राहुल यांची महत्वाची विकेट्स गमावली. त्यानंतर सूर्यकुमार यादवही स्वस्तात बाद झाला. मात्र, त्यानंतर विराट कोहली आणि हार्दिक पांड्याने संघाची जबाबदारी खांद्यावर घेत भारताच्या विजयाचा पाया रचला. अखेरच्या षटकात भारताला 16 धावांची आवश्यकता असताना पहिल्याच चेंडूवर हार्दिक पांड्या बाद झाला. मात्र, विराट कोहलीने संघाची बाजू संभाळून ठेवत भारताला विजय मिळवून दिला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरलेल्या पाकिस्तानच्या संघाची सुरुवात खराब झाली. अर्शदीपनं पाकिस्तानचा कर्णधार बाबरला शून्यावर बाद करत भारताला पहिलं यश मिळवून दिले. त्यानंतरही भारतानं गोलंदाजी कसून सुरुच ठेवली. अवघ्या चार धावांवर असताना रिझवानही बाद झाला. पण त्यानंतर शान मकसूद (52) आणि इफ्तिकार अहमद (51) यांनी डाव सावरला आणि दोघांनी दमदार अर्धशतकं ठोकत पाकिस्तानची धावसंख्या सावरली. त्यांच्याशिवाय इतर फलंदाज स्वस्तात माघारी परतत होते. पण गोलंदाज शाहीन आफ्रिदीने आठ चेंडूत 16 धावांची खेळी करत आणखी योगदान दिले. ज्यामुळे पाकिस्तानने 159 धावा स्कोरबोर्डवर लावल्या. भारताकडून हार्दिक पांड्या आणि अर्शदीप सिंह यांनी प्रत्येकी तीन तर मोहम्मद शमी बुवनेश्वर कुमार यांनी प्रत्येकी एक-एक विकेट घेतली.








विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# सर जो तेरा चकराये ...

आधुनिक केसरी

जॉनी वॉकरचं 'प्यासा' या चित्रपटातलं ' सर जो तेरा चकराये या दिल डुबा जाये...' हे गाणं जुन्या पिढीतल्या रसिकांना आजही आठवत असेल. जॉनी वॉकरचा अभिनय आणि मोहम्मद रफी यांचा आवाज हे इतकं भन्नाट कॉम्बिनेशन जमलं आहे ना की ज्याचं नाव ते ! मला तर लहानपणी वाटायचं की हे गाणं जॉनी वॉकर यांनींच म्हटलंय. पण नंतर कळलं की गायक रफीसाब आहेत. एकदम जादुई आवाज. दूध, चहा, साखर या सगळ्यांची जशी अप्रतिम भट्टी जमून सुरेख चहा जमावा तशी या गाण्याची भट्टी जमली आहे. रफीचा गारुड करणारा आवाज, जॉनी वॉकर यांनी केलेला अफलातून अभिनय आणि एस डी बर्मन यांचं संगीत. हे गाणं ऐकता ऐकता निराशा, निरुत्साह, आळस कुठल्या कुठे पळून जातो. चेहऱ्यावर छान हसू उमटतं ही या गाण्याची ताकद.

मुंबईच्या चौपाटीवर किंवा अन्य कुठे पर्यटनस्थळी जॉनी वॉकरचे तेल मॉलिश करणारे हे भाऊबंद हमखास भेटतात. बहुतेक न्हावी मंडळी सुद्धा हे काम मोठया कौशल्याने करतात. नापित , नाभिक, वारिक, हजाम इ वेगवेगळे शब्द त्यांच्यासाठी रूढ आहेत. मुंबई, पुण्यासारख्या मोठया शहरातील रेल्वे स्थानकांबाहेर काही नाभिक मंडळी रांगेने आपली दुकाने लावून बसलेली दिसतात. सकाळी सकाळी गाड्यातून उतरणारे मुंबईकर, पुणेकर ज्यांना घरी दाढी करायला वेळ मिळत नाही ते इथे येतात. न्हाव्याच्या ताब्यात आपली मान मुकाटपणे देतात. न्हाव्याकडे येताना दाढी वाढलेली, अस्ताव्यस्त वाढलेले केस अशा अवस्थेत आलेली मंडळी जाताना एकदम फ्रेश होऊन जातात. त्यांचा नूरच पालटलेला असतो. **(क्रमशः)**





# आनंदी पहाट

## शक्तिप्रदर्शनाचा त्रास इतरांना होऊ नये

आधुनिक केसरी

कार्यक्रम कोणताही असोत, स्पीकर्सच्या भिंती आणि कर्णकर्कश आवाज हा पाहिजेच. काहीवेळा तर हेच कळत नाही कि, कार्यक्रमासाठी ह्या स्पीकर्सच्या भिंती उभ्या केल्या जातात कि, स्पीकर्सच्या भिंतीसाठी कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. सत्यनारायणाची पूजा असेल, लग्न समारंभ असेल, मिरवणुक अथवा वरात असेल, कोणताही धार्मिक उत्सव अथवा जयंतीनिमित्तचा एखादा कार्यक्रम असेल; स्पीकर्सच्या भिंती उभ्या केल्याशिवाय आणि आवाजाची पातळी ओलांडल्याशिवाय कार्यक्रम झाल्यासारखाच वाटत नाही; अशा अविर्भावात असणाऱ्यांच्या कोणत्या जाणीवा शिल्लक राहिलेल्या असतात, हाच कळीचा मुद्दा आहे. त्यांतही त्यावर वाजवली जाणारी गाणी आणि एकूणच त्यांचे संगीत हा तर निराळाच विषय आहे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

स्पीकर्सच्या भिंतीतून निघणारा कर्णकर्कश आवाज मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या अपायकारक असल्याचे अनेकदा माननीय न्यायालयाने देखील बजावल्याचे आपल्या प्रत्येकाला ज्ञात आहेच. अर्थात हे सर्व लोकांकडून मिळवलेल्या वर्गणीतून केले जाते तेव्हा तर तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करण्याशिवाय गत्यंतर नसते. अशांतता पसरवणाऱ्या ह्या स्पीकर्सच्या भिंतीचा स्वीकार आणि अंगीकार करणाऱ्यांच्या उणिवा त्यांना दाखवून देणे म्हणजे मांजरीच्या गळ्यांत घंटा बांधण्यासारखेच असते. ह्याचे एकूणच होणारे दुष्परिणाम समजून घ्यायच्या मनस्थितीत अशावेळेस असणारे किती जण असल्याचे दिसते. फटाकेबाजी आणि घोषणाबाजी करणाऱ्या कोणालाही काळवेळेची जाणीव होत नाही, त्याचे भान रहात नाही. एकप्रकारे शक्तीचे आणि पैशाचे प्रदर्शन करणारे फटाकेबाजी आणि घोषणाबाजी हे दोन्हीही स्वतःसाठी, स्वतःच्या प्रतिष्ठेसाठी, प्रसिद्धीसाठी आणि स्वतःचे महत्व वाढवण्यासाठी करत असल्याचे अगदी सर्वसाधारण व्यक्तीला देखील दिसत आणि कळत असते.



आधुनिक केसरी

## स्वधर्म हा नेक | आचरावा ||

ज्याचे मुखी नाम | रामकृष्ण हरि ||
सुख त्याचे | घरी नांदते रे ||१||

कर्मावरी ठाम | श्रद्धा असे ज्याची ||
विठ्ठलही त्याची | साथ देतो ||२||

भोंदूपणा सारा | पायदळी घेतो ||
अंतरी भजतो | पांडुरंग ||३||

नामा संगे कृती | कृती संगे भक्ती ||
तेथे आदिशक्ती | वास करी ||४||

अंती सत्य जाण | भाव शुद्ध एक ||
स्वधर्म हा नेक | आचररावा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरुपण"

आधुनिक केसरी

## आवाहन

भक्ताचे निजमानसी वससी तू अंबे।
का प्राण आणविसी कंठी येई जगदंबे।।
पौर्णिमा सकल आनंदाची तू अंबे।
अणिमालधिमारूपे तव जगदंबे।।
परशुराम जननी रेणुके तू अंबे।
कालिदासाची कालिमाय जगदंबे।।
जनकाची लाडकी रामंवरा तू अंबे।
परब्रह्मासी एकरूप तू जगदंबे।।
वृषभानुकिशोरी कृष्णप्रिया तू अंबे।
हिमनगदुलारी शिवा तू जगदंबे।।
स्नेहपल्लवांची वर्षा करी तू अंबे।
ऐसे भाग्य आमुचे भाळी जगदंबे।।
निजदासाच्या स्वप्नी येतसे तू अंबे।
चंद्रहास विनवे धाव धाव तू जगदंबे।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# ||तुम्ही नाम घ्यायला लागा, भगवंताचे प्रेम येईलच ||



आधुनिक केसरी

ज्या माणसाला आपला स्वार्थ साधायचा नाही, त्याला कमी पडणे शक्यच नाही. जिथे निःस्वार्थीपणा आहे तिथे भगवंताला पुरवठा केलाच पाहिजे. आपण जगावर प्रेम केल्याशिवाय परत प्रेम मिळणार नाही. जो भगवंताच्या प्रेमात तल्लीन झाला, त्याला बाकीच्या गोष्टींची आठवण राहात नाही. ज्याप्रमाणे मालक घरात आला की चोर पळालाच म्हणून समजा, त्याचप्रमाणे जो भगवंताच्या प्रेमात रमला, तो खात्रीने सुखी बनला; कारण त्याची देहबुद्धी पळून जाते. म्हणून भगवंताला अशा प्रेमाने आळवावे, की त्याच्या डोळ्यांत पाणी यावे. आळवताना आपल्या डोळ्यात पाणी आले की भगवंताच्या डोळ्यांत पाणी येते. भगवंताचे प्रेम लागायला सत्संगतीचा मार्ग अतिशय उत्तम आहे यात शंकाच नाही. परंतु सत्संगती सर्वांनाच मिळेल असे काही निश्चयाने सांगता येणार नाही. दुसरा मार्ग विचाराचा आहे. नेहमी चांगले आणि पवित्र विचार मनात बाळगावेत. भगवंताने सर्वांवर कृपा करावी, त्याने सर्वांचे कल्याण करावे, त्याचे प्रेम सर्वांना यावे, असे विचार नेहमी मनात ठेवून संतांच्या विचारांचे मनन करावे. सर्वांचे कल्याण चिंतण्यात स्वतःचे कल्याण अनायासे होत असते. पण आपण असे पाहतो की आपले विचारसुद्धा नेहमी स्थिर राहात नाहीत. नामस्मरणाला बसल्यानंतर किती अपवित्र विचार आपल्या मनात येत असतात याचा सर्वांना अनुभव आहे ना ? तेव्हा चांगले विचार मनात बाळगणे हेही आपल्या हातात नाही. आता तिसरा मार्ग म्हणजे नाम. नाम हे एकच साधन असे आहे की आपल्याला ते प्रयत्नाने घेता येईल. ते नाम तुम्ही सर्वांनी निःशंकपणे घ्या. त्या नामाच्या विरुद्ध तुम्हाला कुणीही सांगितले तरी त्याचे ऐकू नका. ते नाम कसे घ्यावे वगैरे चिकित्सेत तुम्ही पडू नका. तुम्ही नाम घ्यायला लागा, भगवंताचे प्रेम तुम्हाला आल्याशिवाय राहणार नाही. अगदी सतत निश्चयाने नाम घ्या. जिथे नाम तिथे माझा राम आहे, हा माझा विश्वास तुम्ही बाळगा. दुसरे काही एक न करता सतत निश्चयाने नामात राहणाऱ्या माणसाला संतांची भेट होऊन ते त्याचे कल्याण करतील. भगवंताचे नाम ही ठिणगी आहे. ती फुलवली तर सबंध जग भरून जाईल एवढी मोठी होऊ शकते. ही नामाची ठिणगी आपण सतत जागृत ठेवू या. जो नामात राहिला त्याचा वासनाक्षय झाला आणि दैन्यपणा संपला. ते नाम सर्वांनी मनापासून घ्या, आणि सर्वांनी अगदी आनंदात राहून सुखाने संसार करा. आजचे बोधवचन आहे. २९७. विचार आणि नाम यांनी वासनेला खात्रीने जिंकता येईल.

मग आपले कर्तेपण आपोआप मरून जाईल. श्रीराम समर्थ

**– श्री सद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# संत कान्होपात्रा

आधुनिक केसरी

हौसाच्या संगनमताने तिने फाटके विटके कपडे घातले आणि ती पंढरपूरला निघाली. तिच्या मनाला विठ्ठलाची ओढ लागली. मध्यरात्रीच्या अंधारात एका दासीच्या वेषात तिने मंगळवेढे सोडलं. यापुढे रूपवती तरुण कान्होपात्रेने निर्भयतेने पूर्णपणे विठ्ठलावर विसंबून आपला जीवनक्रम ठरवला. पंढरपूरला आल्यावर तिने पांडुरंगाचं दर्शन घेतलं आणि त्यावेळी ती संपूर्णपणे त्याच्या चरणाशी एकाग्र झाली.

व्याकूळ भावाने ती विठ्ठलाची विनवणी करू लागली –

मज अधिकार नाही । भेटी देई विठाबाई ।।
ठाव देई चरणापाशी । तुझी कान्होपात्रा दासी ।।

आपलं सगळं अस्तित्व विठोबाच्या पायी समपिर्त करून तिने त्याचं दास्यत्व पत्करलं. कान्होपात्रा स्वरचित अभंग गाऊ लागली आणि तिचा स्वगीर्य आवाज ऐकून हजारो वारकरी तल्लीन झाले. तिथे येणारे सारे विठ्ठलावरच्या प्रेमामुळेच येत होते. त्या अभंगातला भाव त्यांच्या हृदयाला भिडला. वृद्ध हौसाबाईने कान्होपात्रेसाठी आणि स्वतःसाठी एक झोपडी बांधली. कान्होपात्रा दिवसातून दोनदा विठ्ठलाचे देऊळ झाडून पुसून लख्ख करत असे. पहाटे आणि रात्री ती देवासमोर नृत्य आणि भजन करी. लोकांना वाटे ती देवाचं वेड घेतलेली, गरीब शेतकऱ्याची पोर आहे. कान्होपात्रा दिवसेंदिवस विठ्ठलभक्तीत खोल बुडत गेली. लोक तिचा आदर करू लागले. भोगविलासाची इच्छा तिला नव्हतीच. मुळचा ओढाच परमार्थाकडे असल्याने तिच्या ध्यानी मनी विठ्ठल राहू लागला. मन त्याच्या चरणी एकाग्र होऊ लागले. त्याची भेट व्हावी म्हणून तळमळ होऊ लागली.




जिवाचे जिवलगे माझे कृष्णाई कान्हाई सावळे डोळसे करूणा येथु देई काही अशी आर्त विनवणी उमटू लागली. कालांतराने, सर्व सुखाचे जे निजसुखाचे सारगे माय तो हा पंढरीराय विटेवरी असा समाधानाचा, शांतीचा भाव मनी उपजला. विठ्ठलाचे चरण हे आत्मसुखासमान असल्याने सर्व इच्छा, वासना निमाल्या. इकडे नगरप्रमुखावर खवळलेल्या लोकांनी त्याच्या घराला आग लावली. पण तो निसटून बादशहाकडे गेला. बादशहाच्या साहाय्याने त्याने लोकांवर सूड उगवला. त्यांच्या घरादारांवर नांगर फिरवला. त्यांना पकडून तुरुंगात टाकून हाल केले आणि सर्वत्र वचक बसवला. नंतर त्याने कान्होपात्रेचा पत्ता मिळवला आणि तिच्या लावण्याचं वर्णन करून तिला जनानखान्यात दाखल करण्याविषयी बादशहाला उद्युक्त केलं. बादशहाने पंढरपूरच्या पुजाऱ्यावर फर्मान बजावलं की त्याने कान्होपात्रेला स्वाधीन करावं. नाहीतर मंदिर जमीनदोस्त करण्यात येईल. विठ्ठलमंदिराला सैनिकांचा गराडा पडला. आपल्यासाठी लाखोंचं भक्तिस्थान असलेलं सारसर्वस्व विठ्ठलाचं राऊळ उद्ध्वस्त व्हावं हे तिला सहन होणं शक्यच नव्हतं. कान्होपात्रा सेनाधिकाऱ्यासमोर हजर झाली. तिने एकवार विठ्ठलाचं दर्शन घेण्याची परवानगी मागितली.

कान्होपात्रा तडक देवासमोर हात जोडून उभी राहिली. देवापासून दूर जाण्याची कल्पना तिच्यासाठी असह्य होती. ती देवाला म्हणाली, नको देवराया अंत आता पाहू । प्राण हा सर्वस्व फुटो पाहे ।। हरिणीचे पाड व्याघ्रे धरियले । मजलागी जाहले तैसे देवा ।। तुजविण ठाव न दिसे त्रिभुवनी । धावे वो जननी विठाबाई ।। मोकलूनी आस, झाले मी उदास । घेई कान्होपात्रेस हृदयास ।। परमेश्वराची आर्त व्याकूळ विनवणी करत असलेला तिचा आवाज **क्रमश :**

# कन्नड तालुक्याचे युवा नेतृत्व प्रा. लखन चव्हाण



आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** आजचा युवक हा भावी देशाचा शिल्पकार असतो, आपला देश तरुणांचा देश आहे आपला देश जरी लोकसंख्येने मोठा असला तरी भारतातील तरूण वर्ग जगातील सर्व आघाड्यांवर पुढे आहे आणि असेच एक नाव आहे तरूण तडफदार भावी शिल्पकार असणारे कन्नड तालुक्याचे युवा नेतृत्व प्रा. लखन चव्हाण. लखन चव्हाण यांना लहानपणा पासूनच सामाजिक कार्याची आवड व नेतृत्वाची धमक होती, ते नेहमीच चांगल्या सामाजिक कार्यात अग्रेसर असत आणि आपला पूर्ण वेळ जनतेचे कामे, जनतेच्या अडीअडचणी आणि त्याच्या सुख-दुःखात सर्वात आधी जाणारा एकमेव व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांचे तालुक्यात नाव लौकिक झाले आहे. भारतात कोरोनाचे जेंव्हा थैमान घातले होते त्यावेळेस कोरोना पेशंट व त्यांच्या नातेवाइकांच्या समस्या सोडविण्यासाठी फार कमी लोकं पुढे आहे, कारण कोरोनाच्या भितीने कोणी सहसा मदतीला धावून जायला तयार होत नव्हते पण या काळात लखन चव्हाण सर्व मदतीच्या क्षेत्रात सर्वात पुढे होते त्यानी या काळात कोरोनापिडीत जनतेची खूप सेवा केली, नेत्र तपासणी, तरुणांना शैक्षणिक मदत, दवाखाना, तहसील अशा अनेक क्षेत्रात नेहमीच निस्वार्थपणे मदत करणे हेच त्यांची ख्याती आहे. ते म्हणतात समाजसेवा म्हणजे ईश्वरसेवा आहे, सेवेचे पुण्य खूप मोठे असते, प्रत्येकाने दिन-दुबळे, गरजवंत, अनाथ, वयोवृद्ध यांच्या सेवेसाठी प्रत्येक युवकाने पुढे येवून मदत केली पाहिजे सेवेतूं मिळणारा आनंद म्हणजेच दिवाळी आहे व अशा प्रकारची दिवाळी प्रत्येकाने अनुभवावी त्यातील आनंदाचे सुख खूप मोठे असते.

युवक प्रत्येक चित्र बदलवू शकतात, युवक देशाचे आधारस्तंभ आहेत, राष्ट्र उभारणीत सर्वात महत्त्वाचा वाटा युवकांचा आहे आणि त्यांनी ती जवाबदारी चांगल्या प्रकारे सांभाळली तर भारत जगात सर्वात बलवान राष्ट्र म्हणून पुढे येण्यास काहीच वेळ लागणार नाही. दिवाळी निमित्त सर्व जनतेला मनपूर्वक शुभेच्छा !



# जगा जाणीव दे प्रकाशाची

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रात प्रत्यके सण-उत्सव हा सोहळा म्हणून भौतिक पद्धतीने साजरा करतांना त्याला सुंदर विचारांची जोड देण्याचं महत्वपूर्ण कार्य येथील संत, विचारवंत, प्रबोधनकार आणि समाजसुधारक यांनी केलेले आहे. प्रत्येक सण हा काहीतरी प्रतिक म्हणून साजरा करतांना त्यामागील काही वैचारिक आणि सांस्कृतिक परंपरा समाजात रुजविण्याचा प्रयत्न येथील सृजन करत आले आहेत. गुरुपूजन, प्राणी पूजन, निसर्ग देवतांचे पूजन, शेती-मातीचे पूजन, मातृ-पितृपूजन आणि शेवटी तिमिर गुण नष्ट करून प्रकाश पूजनाने 'प्रकाशोत्सव' दिपावली संपन्न होते! सणसमारंभाचे उत्सव, सोहळे करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, वैचारिक, आणि सामाजिक क्षेत्रामध्ये विविध विचारप्रवाह आणि सांप्रदाय महत्वाची भूमिका बजावत आले आहेत. त्या विविध प्रवाहामध्ये वारकरी सांप्रदाय हा येथील संस्कृतीच्या नसानसांमध्ये प्रवाही असून वारकरी सांप्रदायाने येथील समाजमनामध्ये प्रबोधनाची नांगरणी करून वैचारिक बीज खोलवर रुजविण्याचे महत्कार्य केले.**

संतांनी दिपावली सणाचे महत्व विषद करतांना प्रकाशरूपी ज्ञानाची दिवाळी प्रकट करण्याचे तेजोमय कार्य केले आहे. मनातील षडविकारांची, अविवेकाची, निराशेची काजळी दूर करण्यासाठी ज्ञानरूपी पणती पेटवून असमंत नवविचारांनी उजळवून टाकावा लागेल! हाच दुर्दम्य आत्मविश्वास संतांनी येथील लोकांच्या तनमनात कीर्तन-प्रवचनाने पेरला. सर्वच संतांनी दिवाळी प्रतिकाने समाजातील अज्ञानरूपी अंधःकार घालविण्याचे कार्य केले. कार्तिक महिन्यामध्ये मंदिरांमध्ये काकडा-भजन रंगत असतांना संत सहज उपदेश करीत तमोगुनांना घालविण्याचे महान कार्य करतात. संत साहित्यातील वैचारिक दिव्यांचा सोज्वळ प्रकाश जर अंतकरणामध्ये प्रविष्ट झाला, तर साधकांचे जीवन तेजोमय विचारांनी प्रकाशमान होईल आणि तो आनंदाने नाचू-बागडू लागेल. त्यामुळेच थोतांड-कर्मकांडाच्या चक्रव्युव्हामध्ये अडकलेल्यांना,

सुर्ये आधिष्ठीली प्राची | जगा जाणिव दे प्रकाशाची |

या ओव्या लिहून ज्ञानोबाराय आपल्या सैद्धांतिक आणि दृष्टांतिक सृजनत्वाचा अलौकिक अनुभवाविष्कार प्रकट करतात. सर्वसामान्यांना आपले जीवन तेजोमय, लखलखीत करायचे असेल तर त्यांनी सूर्योदयाच्या अगोदर प्रकट होणाऱ्या प्राची-प्रकाशाप्रमाणे आपल्या जीवनात मानवी देहाच्या नेणीवेची जाणीव ठेवून स्वःजीवन तेजोमय करावे! अविवेकरुपी षडरिपू जीवनातून निष्कशित करण्यासाठी साधकाने सावध झाले पाहिजे. असे जर झाले तर माणसाच्या जीवनातील अंधार अदृश्य होऊन मन निर्मल हृदयकमल म्हणजेच अंतःकरण प्रकाशाने उजळून जाईल ! अगदी 'उजेडी राहिले उजेड होऊन' या अभंगाप्रमाणे आंतर्बाह्य उजेडच उजेड ! आणि मग

मी अविवेकाची काजळी। फेडूनि विवेकदीप उजळी |

यातून माउली अत्युच्च विचार आणि जीवन सौंदर्य प्रकट करतात. मानवाचे जीवन जर अखंड तेजोमय, लखलखित व्हावयाचे असेल तर प्रत्येकाने आपल्या मनातील अविवेकी विचार समूळ उपटून विवेकरुपी बीजांकुर रुजवले पाहिजेत. योगीपुरुष ज्याप्रमाणे योगसाधनेद्वारे सप्तचक्र नियंत्रित करून निरंतर आनंदी राहतात, तसे कोणत्याही योगसाधनेशिवाय सामान्य मनुष्य स्वहृदयामध्ये विवेकदीप प्रज्वलित करून निरंतर आनंदी राहू शकतो! म्हणूनच या दिपोत्सव पर्वावर माणसाने अखंड जीवन ज्ञानाच्या तेजोमय दिपाने, आनंदाने ओतप्रोत भरून टाकावे. त्यामुळेच माउली संपूर्ण विश्वात्मक देवतेला पसाभर दान मागतांना कोणतीही भौतिक, नश्वर गोष्ट मागत नाहीत, तर ते

दुरितांचे तिमीर जावो। विश्वस्वधर्म सूर्ये पाहो।

हे दान मागतात. अज्ञानरुपी अंधःकाराने ग्रासलेल्या लोकांच्या जीवनातील अंधार नष्ट होऊन ज्ञानरुपी प्रकाशाने त्यांचे हृदय तेजोमय व्हावे आणि ज्याला जे पाहिजे ते त्याला निरंतर मिळत रहावे हीच विश्व प्रार्थना माउली करतात. संपूर्ण विश्वातील अज्ञान-अंधकार नष्ट व्हावा आणि प्रत्येक जीवनात प्रकाशरूपी ज्ञानोदय व्हावा हाच खरा दिवाळी सण!

याशिवाय कीर्तन रंगात नाचतांना संत नामदेवराय ज्ञानाचा दीप घरोघरी उजळवतांना दिवाळी सणाला प्रत्यक्ष पांडुरंगालाच घरी घेऊन येतात. भक्तीच्या बळावर संत प्रत्यक्ष देव घरी घेऊन आले आणि विठ्ठलाला चराचरात, जळी-स्थळी प्राप्त केले. याचा परिणाम म्हणजे संत जनाबाई जणू त्या सावळ्या विठूरायाला घरी बोलवतात आणि प्रेमाखातर देव जातो सुद्धा ! चोखोबांच्या पत्नीचं बाळंतपण असो कि सज्जन कसायची ढोरे ओढणे असो ! म्हणूनच तर ते बोलावतात,

आनंदाची दिवाळी। घरी बोलवा वनमाळी॥

हि संतांची भक्तीची शक्ती त्यांनी समाजाला उपदेश करण्यासाठी खर्ची घातली. देवाला हृदयरूपी घरात कोंडून त्याला लिंबलोन करणारी हि संतमंडळी आणि त्यांचे विठ्ठलप्रेम, भक्ती अलौकिकच !

दुसरीकडे वारकरी सांप्रदायाचे कलशस्थानी विराजमान असणारे जगद्गुरू तुकोबाराय आपली वैचारिक दिपावली साजरी करतांना जगण्याची अखंड दिवाळीच दिवाळी कशी झाली ( ? ) याचं गोड चिंतन मांडतात.

दसरा-दिवाळी तोची आम्हा सण। सखे संतजन भेटतील॥

संत वर्षभर दिवाळी साजरी करत असतात. ज्ञानाच्या परीसस्पर्शामुळे संतांना रोज दिवाळी आहे. संत ज्ञान, विचार आणि वचनांच्या मार्गाने चंदनाने बोरी सुद्धा व्यापून टाकल्या आणि नकारात्मक विचारांचे काटे अदृश्य होऊन जीवन अंतर्बाह्य निर्मळ चंदन, नितांत सुंदर झाले !

संतांच्या ज्ञान-वचनांची अमोघ दिवाळीची क्षणिक अनुभूती घेतली असता, आंतरिक ज्ञानानंद हा अलौकिक, अवीट, अतिगोड असल्याचा प्रत्यय येतो. तमाम संत वचने आणि त्यांच्या आव्हानात्मक जीवनाचा विचार केल्यास आपले जीवन क्षणार्धात बदलून जाईल. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई या भावडांच्या जगण्याची प्रचंड अवहेलना, आई-वडिलांचे देहांत प्रायश्चित आणि येथील नतदृष्ट, कुजलेल्या विचारांच्या लोकांशी संघर्ष करत प्रतीकाराशिवाय आपले जीवन नितांत सुंदर बनवले! त्यांनी आनंद-ज्ञानाची दिवाळी साजरी केली! खडतर जगण्याचा उत्सव करून हरिपाठ, ज्ञानेश्वरी, चांगदेव पासष्टी आणि अमृतानुभव सारखे अलौकिक, ज्ञान आणि जीवनाच्या तत्वज्ञानाने ओतप्रोत भरलेले ग्रंथ दिले. तुकोबांचे जीवन यापेक्षाही खडतर! प्रचंड दुष्काळ, संसार भंगला, पाटील कोपला, धर्ममार्तंडांनी काठ्यांनी मारलं, अभंग पाण्यात बुडवले! आई-वडील, बायको, मुलगा, गुरे-ढोरे पटापटा मेली! काय खावे, कुणीकडे जावे ( ? ) या अनंत प्रश्नांनी वेढलेले असतांना तुकोबा डगमगले नाहीत. त्यांनी अभंग, भजन, भंडारा डोंगर, टाळ, वीणा सोडला नाही! आपला भोवताल आनंदाचे डोही आनंद तरंग करून आसमंत उजळवून टाकला! आनंदाचे तरंग प्रत्येकाच्या अंतरंगात रुजविले !

तेंव्हा, आजच्या या कठीण, खडतर, पूरग्रस्त प्रसंगी आपण संत विचारांची कास धरली पाहिजे. नुसती भजनं म्हणून चालणार नाही तर आपल्या भोवताल न पेटनारी चूल पेटवण्याचे काम करावे लागेल! पुरात एखाद्याचे शेत वाहून गेले असल्यास त्यास उभारी द्यावी लागेल! दुःखीतांचे अश्रू पुसून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्या एव्हढे दुसरे पुण्य नाही! गरजवंतांना मदत करणे, भुकेल्यांना अन्न देणे आणि दु;खीतांचे सांत्वन करून त्यांना धीर देणे हीच खरी संत विचारांची दिवाळी!

दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्य पाहो ।

प्रमाणे 'वसुधैव कुटुंबकम' या विश्वधर्माचे, संतविचारांचे पाईकपण अंगी बाणवून रंजल्या-गांजल्यांच्या जीवनातील एक क्षण जरी आनंदाने फुलवता आला, किंचित तिमिर घालवून तेजोमय आनंद फुलविता आला तरच खरी संत विचारांची दिवाळी साजरी होईल अन्यथा सर्व फापट पसारा किंवा व्यर्थ बडबड ! चला तर मनामनात जाणीव निर्माण करणारी दिवाळी साजरी करूया! सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

प्रा. डॉ. विठ्ठल खंडूजी जायभाये
मो. 9158064068

# सुवर्णनगरीला झळाळी

आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव :** दीपोत्सवाला सुरुवात झाली असून, शनिवारी धनत्रयोदशीचा मुहूर्त साधत सोने-चांदी विक्रीतून शहरासह जिल्ह्यात वीस ते पंचवीस कोटींची उलाढाल झाली. सुवर्णपेढ्यांमध्ये चक्क पाय ठेवायला जागा नसल्याचे चित्र दिसून आले. सोन्या-चांदीच्या दरात वाढ झाली असली, तरीही खरेदीसाठी गुंतवणूकदारांसह ग्राहकांनी गर्दी केल्याची माहिती सराफ व्यावसायिकांनी दिली.

साडेतीन मुहूर्तावर विविध वस्तूंच्या खरेदीसह सोने-चांदी खरेदीलाही अनन्यसाधारण महत्त्व आहे. धनत्रयोदशीला एक ग्रॅम सोने खरेदी करण्यावर ग्राहकांचा भर असतो. यंदा शनिवारी व रविवार असे दोन दिवस धनत्रयोदशीचा मुहूर्त आहे. सकाळपासूनच सुवर्णपेढ्यांमध्ये धनत्रयोदशीचा मुहूर्त साधत सोने-चांदी खरेदीसाठी गर्दी झाल्याचे पाहायला मिळाले. आठवडाभरापासून सोने-चांदीच्या दरात चढ-उतार सुरू होते. आता दोन-तीन दिवसांपासून सोन्याच्या प्रतितोळ्याच्या दरा बाराशे, तर चांदीच्या प्रतिकिलो दरात तेवीसशे रुपयांची वाढ झाली असली, खरेदीसाठी उत्साह दिसून आला. शनिवारी सोन्याचा प्रतितोळा दर ५१ हजार ५०० रुपयांपर्यंत, तर चांदीचा प्रतिकिलो दर ५९ हजार रुपये होता. रविवारी सोने प्रतितोळा ५१ हजार ५०० रुपये आहे. विजयादशमीनंतर धनत्रयोदशीचा मुहूर्त साधत शहरासह जिल्ह्यात शनिवारी सोने-चांदीच्या विक्रीतून वीस ते पंचवीस कोटींची उलाढाल झाल्याचे सांगण्यात आले. सुवर्णनगरी जळगावमध्ये सुमारे पंधरा कोटींपेक्षा अधिक उलाढाल झाल्याचे सांगण्यात आले. यंदा करोनाचे सावट कमी झाल्याने खरेदी अधिक वाढली असल्याचे चित्र दिसून आले. लहान व कमी वजनाच्या दागिन्यांना ग्राहकांकडून अधिक पसंती होती. सोने दागिने, शुद्ध सोन्याचे तुकडे, लड, शिक्के यांसह कलाकुसरीच्या दागिन्यांना सर्वाधिक मागणी असल्याचे सुवर्ण व्यावसायिकांनी सांगितले.



# गांधी कुटुंबाला धक्का



आधुनिक केसरी

केंद्र सरकारने काँग्रेसला मोठा धक्का दिला आहे. राजीव गांधी फाऊंडेशनचे परदेशातून फंड घेण्याचा परवाना रद्द केला आहे. परदेशी योगदान कायद्यांतर्गत गृह मंत्रालयाने राजीव गांधी फाऊंडेशनचा परवाना रद्द केला आहे. विदेशी निधीचा गैरवापर केल्याचा ठपका ठेवत गृह मंत्रालयाकडून ही कारवाई केली आहे. जुलै २०२२मध्ये या प्रकरणी चौकशी समिती स्थापन केली होती. त्याच्या अहवालाच्या आधारे ही कारवाई करण्यात आली आहे. यात समितीत गृह मंत्रालय, ईडी, सीबीआय आणि आयकर विभागाचे अधिकारी होते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, FCRA लायसन्स रद्द करण्याची नोटिस राजीव गांधी फाऊंडेशनचे ऑफिस बिअरर यांना पाठवण्यात आली आहे. माजी काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी या राजीव गांधी फाऊंडेशनच्या अध्यक्षा आहेत. तर, ट्रस्टमध्ये माजी पंतप्रधान मनमोहन सिंह, माजी अर्थमंत्री पी. चिदंबरम आणि राहुल गांधी आणि प्रियांका गांधी हे आहेत. RGFच्या वेबसाइटनपसार, ही संस्था १९९१ साली स्थापन झाली होती. राजीव गांधी फाउंडेशनची स्थापना माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचे व्हिजन पूर्ण करण्याच्या उद्देशाने केली होती. आरोग्य, साक्षरता, विज्ञान आणि तंत्रज्ञान यासारख्या विषयांवर या फाऊंडेशनने काम केलं आहे. जून २०२०मध्ये भाजपने फाऊंडेशनवर परदेशातून फंडिंग होत असल्याचा आरोप केला होता. भाजप नेता रविशंकर प्रसाद यांनी हा दावा केला होता. चीनने राजीव गांधी फाऊंडेशनसाठी फंड दिला होता. कायद्यानुसार कोणताही राजकीय पक्ष सरकारच्या परवानगीशिवाय विदेशातून चलन स्वीकारु शकत नाही. या डोनेशनसाठी काँग्रेसने सरकारची परवानगी घेतली होती का? हे त्यांनी स्पष्ट करावे, असं रविशंकर प्रसाद यांनी म्हटलं होतं. राजीव गांधी फाउंडेशनसाठी २००५-०६ च्या डोनरच्या यादीत चीनच्या एम्बेसीने फंड दिला आहे. यात अनेक उद्योगपती व पीएसयू यांचीही नावं आहेत. चीनमधून या फाउंडेशनला ९० लाखांची फंडिंग करण्यात आली, असा आरोपही रविशंकर प्रसाद यांनी केला आहे.

# जग तिसऱ्या महायुध्दाकडे



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**2020 मधील अजरबैझान-आर्मेनिया युद्ध ,2021 चे अफगाणिस्तान-तालिबान युद्ध हे महाभयानक युद्ध झाले होते.गेल्या आठ महिन्यांपासून सुरू असलेले रशिया-युक्रेन युद्ध हे अत्यंत भयावह स्थितीमध्ये असुन परमाणू युध्दाची शक्यता वर्तवली जात आहे.कारण हे युद्ध आता रशिया -युक्रेनपुरते सीमित रहाले नसुन नाटो विरूद्ध रशिया अशी होण्याची शक्यता आहे.त्यामुळे तिसऱ्या महायुध्दाचे स्पष्ट संकेत दिसत आहे.त्याचप्रमाणे चीन-तैवान संघर्ष सुरूच आहे. अशा भयावह स्थितीची पुणरावृत्ती होणार नाही याची दक्षता "संयुक्त राष्ट्रसंघाने"घेतली पाहिजे.कारण सध्याच्या परिस्थितीत रशिया -युक्रेन युद्ध जगाला हादरा देवू शकते.याकरिता जगातील "विध्वंसकारी" परीस्थिती पहाता "संयुक्त राष्ट्रसंघाने" कठोर पाऊल उचलण्याची गरज.**

आज संयुक्त राष्ट्रसंघ 77 वर्षांचा झाला असला तरीही जगात संघर्ष सुरूच आहे ही अत्यंत चिंताजनक व गंभीर बाब आहे. संयुक्त राष्ट्रसंघटना अनेक देशांतील घडामोडीवर नियंत्रण ठेवण्याचे काम करीत असते.पहिल्या महायुद्धानंतर 1929 मध्ये राष्ट्र संघाची स्थापना करण्यात आली. परंतु राष्ट्रसंघ प्रभावहीन असल्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघटनेची 24आक्टोंबर 1945 ला स्थापना करण्यात आली. यावेळी संयुक्त राष्ट्र अधिपत्रावर 50 देशांच्या सह्यानीशी याची स्थापना करण्यात आली.परंतु आता जगातील अनेक देश संयुक्त राष्ट्र संघटनेचे सदस्य आहेत.यामुळे प्रत्येक देशाला आप-आपल्या तक्रारी मांडन्याचा अधिकार संयुक्त राष्ट्रसंघटनेने दीलेला आहे.युध्द जन्य परीस्थिती,भुकमरी, कुपोषण,मानवधिकार,अंतराष्ट्रीय सुरक्षा,आर्थिक विकास, सामाजिक प्रगती आणि विश्व शांति इत्यादी संपूर्ण बाबींनवर चर्चा संयुक्त राष्ट्र संघटनेच्या माध्यमातून केली जाते. दुसऱ्या महायुद्धानंतर विजयी झालेल्या देशांनी एकत्र येऊन संयुक्त राष्ट्राला आंतरराष्ट्रीय संघर्षामध्ये हस्तक्षेप करण्याच्या उद्देशाने संघटनेची स्थापना करण्यात आली.संघटनेचा उद्देश हा आहे की भविष्यात द्वीतिय महायुध्दासारखी महाभयानक परीस्थिती उदभवु नये या उद्देशाने याची स्थापना करण्यात आलेली आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेची संरचना शक्तीशाली देश अमेरिका, फ्रांस, ब्रिटन,रूस आणि संयुक्त राजशाही यांनी द्वीतीय विश्व युध्दात अत्यंत महत्वाची भूमिका बजावली होती. सध्याच्या परिस्थितीत संयुक्त राष्ट्रसंघटनेमध्ये 193 देश आहेत. जगातील सर्वच आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त देश या संस्थेशी जुडुन आहेत. या संस्थेची संरचना,आम सभा,सुरक्षा परिषद, आर्थिक व सामाजिक परिषद, सचिवालय आणि आंतरराष्ट्रीय न्यायालय या संपूर्ण बाबीं या संस्थेमध्ये आहेत.संयुक्त राष्ट्र संघटना ही एक चांगली आंतरराष्ट्रीय उपयोगी संघटना आहे. गेल्या 20 वर्षापासुन अफगाणिस्तानमध्ये अमेरिका व नाटोची सेना होती.यामुळे अफगाणिस्तानची जनता स्वतःला सुरक्षित समजत होते.परंतु अमेरिकेने 2021 मध्ये आपले सैन्य माघारी बोलावल्यामुळे अवघ्या 100 दिवसात खुनी तांडव निर्माण होवून लाखो निरअपराध्यांचा बळी तालिबानी आतंकवाद्यांनी घेतला व अफगाणिस्तानवर संपूर्ण कब्जा मिळविला आणि अफगाणिस्तानला रक्ताच्या लाथोळ्यात लोटले.परंतु यात संयुक्त राष्ट्र संघाने थोडासाही हस्तक्षेप केला नाही ही संयुक्त राष्ट्रसंघाची शोकांतिकाच म्हणावी लागेल.संयुक्तराष्ट्र संघटनेच्या माध्यमातून पाकिस्तान नेहमी भारताच्या विरूद्ध चिखल फेक करीत असताना दिसून येते. सिरियामधील अत्याचाराच्या घटना संयुक्त राष्ट्रसंघापुढे मांडुन या घटना जम्मु काश्मिरमध्ये घडत असल्याचे सांगून भारत मानवाधिकाराचे उल्लंघन करीत असल्याचा पोपोगंडा पाकिस्तान नेहमीच करीत असतो. कारण भारतीय घटनेतील 370 व 35 ए कलम हटविल्याचे दुःख पाकिस्तानला जास्तच होत असल्याचे दिसून येते.त्यामुळे हा मुद्दासुध्दा पाकिस्तानने संयुक्त राष्ट्रांमध्ये अनेकदा नेलेला आहे.परंतु संयुक्त राष्ट्राने पाकिस्तानचे संपूर्ण आरोप फेटाळून लावले.आज संयुक्त राष्ट्र संघ नसता तर जगामध्ये अनेक देशात आपसा-आपसात युध्द पहायला मिळाली असती. कारण आज जगातील संपूर्ण राष्ट्रे "बारूदच्या ढीगाऱ्यावर"बसली आहेत व एकमेकांना धमकी देताना दिसतात.परंतु संयुक्त राष्ट्र संघटनेच्या माध्यमातून अनेक राष्ट्रांमध्ये होत असलेला संघर्ष व कटुता दुर करण्याचे काम आज संयुक्त राष्ट्र संघटना करीत आहे.आज उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरिया यांच्यात नेहमी तनातनीचे वावरत दीसायचे परंतु संयुक्त राष्ट्र संघटनेच्या माध्यमातून यावर तोडगा काढण्यात आला व युध्दजन्य परीस्थिती हाताळण्याचे काम संयुक्त राष्ट्रसंघटनेने केले.उत्तर कोरियाचा "तानाशहा किंम जोंग उन" हा नेहमी अमेरिकेला युध्दाची धमकी देत असतो परंतु संयुक्त राष्ट्रसंघटना याला हाताळण्याचे काम करीत असते.2020 मध्ये अजरबैझान-आर्मेनिया यांच्यातील संघर्ष टोकाला गेला होता.यांच्या संघर्षामुळे तिसऱ्या महायुद्धाचे बादल जगावर दिसत होते.कारण अजरबैझान-आर्मेनिया यांचा संघर्ष गेल्या 100 वर्षांपासून सुरू आहे.हा संघर्ष थांबावा याकरिता अमेरिका व रशिया कसोटीचे प्रयत्न करीत होते परंतु युद्ध थांबे ना.यानंतर संयुक्त राष्ट्र संघाने अजरबैझान-आर्मेनिया यांच्यातील संघर्ष थांबवीण्या करीता युध्दपातळीवर प्रयत्न करून युद्ध थांबवीले.अन्यथा मुस्लिम राष्ट्र विरूद्ध ईसाइ राष्ट्र अशी युद्धाची स्थिती उद्भवण्याची शक्यता होती.अशी कठीण परिस्थिती निवळण्याकरीता "संयुक्त राष्ट्र संघाने"टोकाची भूमिका घेने गरजेचे असते. चीनने सुपर पावर बनण्याच्या उद्देशाने वुहान मधुन कोरोणा व्हायरस निर्माण केला,कोरोणा महामारीने जगात मृत्यूचे तांडव निर्माण केले.याकरिता "संयुक्त राष्ट्रसंघाने" जगातील संपूर्ण संघर्षमय परिस्थितीला हाताळण्याची गरज आहे.अन्यथा अनर्थ होऊ शकतो याला नाकारता येत नाही. चीनची विस्तारवादी नीती रोखण्याकरीता व पाकिस्तानच्या आतंकवादी कारवाया रोखण्याकरीता पश्चिम आशियात नवे क्वाड स्थापन करण्यात आले आहे यात भारत, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि जापान हे देश आहेत यामुळे आशिया खंडात शांतता प्रस्थापित करण्यास मोठी मदत होणार आहे.संयुक्त राष्ट्रसंघ जरी 77 वर्षांचा झाला असला तरी त्यात नवीन उर्जा निर्माण करून जगातील संघर्षमय वातावरण यावर ताबडतोब अंकुश लावण्याची गरज आहे.कारण संयुक्त राष्ट्र संघाने अनेक महत्वपूर्ण कार्य केले आहे याचे उदाहरण जगापुढे आहे. पाकीस्तान आताही खुंखार आतंकवाद्यांना खत पाणी देत आहे व भारत विरोधी कारवाईला अंजाम देण्याचे काम नेहमीच करीत असतो.परंतु भारत त्याला जशास तसे उत्तर देत आहे. संयुक्त राष्ट्रसंघटनेला भारताने सीध्द करून दाखवले की भारत विश्वामध्ये शांती प्रस्थापित करू शकते.भारताचे प्रखर नेत्यृत्व व प्रखर विचाराने संपूर्ण संयुक्त राष्ट्रसंघनेतील 193 देश प्रभावीत आहे.त्यामुळेच आज भारताची मान उंचावली आहे.भारत नेहमी कोणाच्याही सुख दुःखात सहभागी होत असतो. कारण कठीण घडीला मदत करने ही बाब भारताच्या संस्कृतीमध्ये व रक्ता-रक्तामध्ये आहे.हीबाब इंदिरा गांधी, अटलबिहारी वाजपेयी,सुष्मा स्वराज, नरेंद्र मोदी यांनी सीध्द करून दाखविली. भारताने नेहमी मानवाच्या कल्याणासाठी व हीतासाठी आवाज बुलंद आहे यात पर्यावरणाचा मुद्दा,ग्लोबल वॉर्मींग व निसर्गाची ढासळती परीस्थिती या संपूर्ण बाबींवर भारताने संयुक्त राष्ट्राचे लक्ष केंद्रित केले आहे.भारताने आणि संयुक्त राष्ट्राने पाकिस्तानला नेहमी रक्ताच्या थारोळ्यातुन बाहेर काढण्याचे प्रयत्न केले आहे. परंतु पाकिस्तानच्या वागनुकीवरून असे दीसुन येते की कुत्र्याची शेपूट वाकडी ती वाकडीच. यामुळे पाकिस्तानने आतातरी सुधरूनजावे अन्यथा पाकिस्तानचा विनाश अटळ आहे. आज जगात कोणत्याही देशांशी वैरत्व करने म्हणजे तिसऱ्या महायुद्धाकडे वळने होय. देशा-देशामध्ये कटुता निर्माण होवु नये किंवा कटुता निर्माण झाली तर ती निवळण्याकरीता आज संयुक्त राष्ट्र संघटना रोखठोक भुमिका बजावण्याचे काम करीत आहे.अन्यथा महायुद्ध केंव्हाही उद्भवले असते. परंतु यावर ब्रेक आणि लगाम लावण्याचे काम संयुक्त राष्ट्र संघटना करीत आहे. म्हणजेच संयुक्त राष्ट्र संघटनेच्या माध्यमातून जनकल्यानाचे काम मोठ्या प्रमाणात होतांना दीसते. गेल्या 75 वर्षांपासून भारताविरुद्ध पाकिस्तानच्या कुरापती सुरूच होत्या आणि आहे. परंतु भारताने पाकिस्तानची पोल खोलल्याने संयुक्त राष्ट्र संघाने पाकिस्तानला आता पंगू केल्याचे दिसून येते. त्यामुळे संयुक्त राष्ट्राने आनखी कडक प्रतीबंध लावुन पाकिस्तानला त्याची जागा दाखविली पाहिजे. आज संयुक्त राष्ट्रसंघाच्या नजरेत भारत विश्वशांतीचा दुत असल्याचे संबोधले जाते.आज जगातील देशांकरीता काही निर्णय घ्यायचा असला तर सर्वप्रथम संयुक्त राष्ट्र संघ भारताशी संवाद करून निर्णय घेत असतो. संयुक्त राष्ट्र संघटनाही जगाला जिवनदान देणारी संस्था असल्याचे मी समजतो.21 व्या शतकात मानवी युध्दापेक्षा आता द्रोणने युध्द सुरू झाल्याचे दिसून येते. द्रोणचे युध्द जगाला घातक सिद्ध होवू शकते. कारण अत्याधुनिक युगात संपूर्ण देश सध्याच्या परीस्थितीत अत्याधुनिक शस्त्र सामग्री, अनुबॉम्ब, मीसाईल, बॅलेस्टीक, क्लस्टरबॉम्ब, अणुबॉम्ब अशाप्रकारचे विनाशकारी आणि घातक शस्त्र सामग्री जगातील संपूर्ण देशांनी अवगत केले आहे. आज संपूर्ण देश अत्याधुनिक द्रोण खरेदीच्या शर्यतीत आहे व प्रत्येक देश यात सामोरे जान्याच्या शर्यतीत आहे. यावर संयुक्त राष्ट्रसंघाने लक्ष ठेवण्याची गरज आहे. अन्यथा पृथ्वीचा विनाश दुर नाही. 1945 ला संयुक्त राष्ट्रांची परीस्थिती वेगळी होती.परंतु गेल्या 5 वर्षात संपूर्ण जगात अत्यंत संघर्षमय वातावरण निर्माण झाले आहे.याकरीता संयुक्त राष्ट्र संघाला आणखी कडक नियमावली तयार करून जगातील खुनी संघर्ष थांबवीलाच पाहिजे. 1945 च्या नंतरची आव्हाने आवश्यकतेनुसार वेगळी होती. परंतु आज संपूर्ण जगापुढे वेगळे आव्हान आहे.पण ज्या हेतूने संयुक्त राष्ट्रांची स्थापणा झाली तो हेतू आजही आहे का ?असा प्रश्न जगापुढे उपस्थित आहे. जगात पुर्वीही गृह युद्ध व्हायची आणि आजही अनेक देशांमध्ये गृहयुद्ध सुरू आहे.परंतु आजचे गृह युद्ध तिसऱ्या महायुद्धाच्या दीशेने वाटचाल करतांना दिसत आहे. संयुक्तराष्ट्र संघाची स्थापना यासाठीही करण्यात आली की दुसऱ्या महायुद्धासारखी परीस्थिती पुन्हा उदभवु नये. त्यामुळे 24 आक्टोंबर संयुक्त राष्ट्र दिवस"लक्षात घेता कठोर पाऊल उचलुन जगातील युद्ध जन्यपरीस्थितीत रोखली पाहिजे.

# नशेखोरीत अडकलेल्यांना अभय कोणाचे



विशाल बेनुस्कर
९४०५८३४२९२

आधुनिक केसरी

**लहान मुलांवर लहानपणापासूनच कुटुंबातून आणि शाळेतून संस्कार घडत असतात परंतु संगत आणि मित्रपरिवार जर अयोग्य असला तर कुटुंबातून आणि शाळेतून मिळालेल्या संस्कारावर काहीसे विरजण पडते आणि नको ती घटना आपल्या पाल्यांबाबत पालकांच्या कानावर पडते. मुलगा व्यसनाच्या आहारी जातो.त्यातून बाहेर निघण्याचा तो थोडाही प्रयत्न करीत नाही किंबहुना मित्रपरिवार देखील मज्जाव करीत नाही. मग सुसंस्कारी मुलगा "व्यसनाधीन" कधी बनतो याची पुरसटशीही कल्पना कुटुंबाला होत नाही. याचा अर्थ त्याच्या कुटुंबाने मुलांवर वचक ठेवला नाही असे बिल्कुल नाही.**

चांगल्या आणि वाईट गोष्टी कोणत्या व त्यापासून होणारे दुष्परिणाम काय होतात याची कल्पना मुलांना शालेय जीवनातूनच दिली जाते. याशिवाय कुटुंबातून देखील मुक्त चर्चा अशा विषयांवर होते. मग तरीही मूलं व्यसनाधीन बनले असे शब्द समाजातून चौफेर बाजूने पालकांच्या कानावर ऐकू येतात. परंतु याला नेमका जबाबदार घटक कोणता असा प्रश्न पडल्यास त्याचे उत्तर म्हणजे भ्रष्ट व्यवस्था,पोषक वातावरण आणि सरकारचे धोरण हे आहेत. जर मुलांची संगत योग्य राहिली असती तर त्यांच्यावर चांगल्या संगतीचे परिणाम जाणवतात परंतु वाईट संगतीच्या मित्रांपासून होणाऱ्या दुष्परिणामांबाबत लाल फितीत अडकलेली भ्रष्ट व्यवस्था लगाम लावण्यात सपशेल अपयशी ठरते व या सुसंगत मुलांचे जीवन कुसंगतीत परावर्तित होते. हल्ली तर अगदी शालेय जीवनातील मुलांकडून अतिशय गंभीर प्रकारचे व्यसन होण्याचे प्रमाण आढळून येते. ही भविष्याच्या दृष्टिकोनातून अतिशय गंभीर बाब म्हणावी लागेल.यामध्ये व्यसनाच्या आहारी जाणारी मुलं अप्रत्यक्षरीत्या गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळू लागतात हे कोणालाही दिसून येत नाही. कारण की हा प्रवास अतिशय संथ गतीने होत असतो. परिणामी तो भविष्यात रौद्ररूप धारण करतो.तर व्यसनाधीन झालेल्या मुलांकडून अनावधानाने नशेच्या ओघात गुन्हाही घडू शकतो आणि सुसंस्कृत असलेल्या कुटुंबातील मुलाला वेळीच पायबंद न घातल्याने तो परिवाराच्या सदस्यांचेही ऐकण्याच्या मनस्थितीत नसतो. त्यामुळे या व्यसनाधीन मुलांवर वेळीच योग्य तो निर्णय घेऊन त्यांवर अंकुश बसविला पाहिजे. तंबाखू, गुटखा, सिगारेट, दारू, गांजा, मटका,सट्टा या गोष्टीवर सरकारने निर्बंध घातले पाहिजे ज्या गोष्टींवर बंदी आहे किंवा विक्री करण्याचे आदेश



नाही त्यादेखील काळ्या बाजारात तर काही ठिकाणी खुलेआम जादा दराने विक्री केल्या जातात.यासाठी संबंधित विभागाचे व पोलिसांचेही अर्थपूर्णहित संबंध असतात त्यामुळे या व्यवसायिकांना "काळ्या" व्यवसायात अभय मिळते. सरकारकडून हजारो रुपयांचा पगार घेऊनही यंत्रणेतील काही भ्रष्ट लोकांमुळे अशा तरुणांचे जीवन बार्बाद करणाऱ्या नशेखोरीच्या व्यवसायांवर लगाम लागत नाही. फक्त हफ्तेखोरीच्या विळख्यात अडकलेल्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना यापुढील काळात नक्कीच चिंतन करण्याची गरज आहे. अन्यथा केवळ "व्यसन" आणि "अवैध व्यवसाय" या दोन गोष्टींमुळे येणारी प्रत्येक पिढी बार्बाद होण्यासाठी आपणच पोषक वातावरण निर्माण करून दिल्याबाबत जबाबदार असाल असे गृहीत धरून आपले मुलंही आपणास "माफ" करणार नाहीत. शासनाने ज्या गोष्टींमुळे अनेकांचे जीवन बार्बाद झाले आहे अशा दारू,सिगारेट, तंबाखू, गुटखा,गांजा इत्यादी गोष्टींवर कायमस्वरूपी बंदी आणून त्यांची अंमलबजावणी शंभर टक्के होईल या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजे.जेथे असे प्रकार संबंधित विभागातील अधिकाऱ्यांच्या निदर्शनास येतील तेथे त्यांनी त्याच क्षणी कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. परंतु काही भ्रष्ट अधिकारी व कर्मचारी हफ्ते खोरीत गुंतल्याने त्यांना या चांगल्या सवयी लागण्यास निश्चितच वेळ लागेल व समाजात बलात्कार, खून, दरोडे, कौटुंबिक कलह, आत्महत्या,व्यसन असे प्रकार हळूहळू कमी होण्यास मदत होईल. कारण चांगल्या गोष्टी घडण्यासाठी प्रतीक्षा करावी लागते. त्यानंतरचा काळ हा निश्चितच उज्वल असेल यात शंका नाही. जर नितिमत्ता साफ ठेवून योग्य वाटचाल ठेवली तर सुसंस्कृत समाज घडण्यास सुरुवात होईल यासाठी नशेखोरी व अवैध धंद्यांच्या जाळ्यात अडकलेल्यांना त्यांची जागा खाकीतील अधिकाऱ्यांनी दाखविणे गरजेचे आहे.अन्यथा "नशेच्या आहारी गेलेल्या युवकांच्या जीवाशी खेळून आपल्यालाही खूप शिकण्याची गरज आहे" हेच समाज म्हटल्याशिवाय राहणार नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-Mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# गझल ही काळजाला भिडणारी भाषा











## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व आरोग्य मित्र महाराष्ट्र आयोजित दिवाळी पहाट गझल संमेलनात विनोद जैतमहाल यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद : गझल हा अतिशय ताकदीचा काव्यप्रकार असून उत्तम गझलेचे वैशिष्ट्य म्हणजे ती थेट काळजाला भिडली पाहिजे, असे प्रतिपादन कवी विनोद जैतमहाल यांनी केले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व आरोग्य मित्र महाराष्ट्र आयोजित दिवाळी पहाट गझल संमेलनात उद्घाटक व अध्यक्षपदावरून ते बोलत होते. 23 ऑक्टोबर रोजी सकाळी 7 वाजता हे संमेलन दै. आधुनिक केसरी औरंगाबाद कार्यालयातून जगभरात ऑनलाइन प्रसारित करण्यात आले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व आरोग्य मित्र महाराष्ट्रचे प्रदेशाध्यक्ष चंदूलाल बियाणी यांच्या संकल्पनेतून गेल्या अनेक वर्षापासून दिवाळी पहाट हा आगळा वेगळा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. या वेळी सुप्रसिद्ध गझलकार गिरीश जोशी,राजू आठवले, सोमनाथ सोनवणे, ऋषभ कुलकर्णी यांनी सहभागी होऊन एकाहून एक सरस गझला सादर केल्या. यावेळी डॉ. प्रभू गोरे, ज्येष्ठ पत्रकार सुधीर कोर्टीकर, प्रा. ज्ञानेश्वर कुलकर्णी-वतनी, कवी सचिन वालतुरे, संदीप घंटे, प्रा. भारत जमधडे, प्रा. सुमित सिंगी आदींची उपस्थिती होती.**

विनोद जैतमहाल यांनी आपल्या मनोगतात उर्दू आणि मराठी गझलांचा थोडक्यात इतिहास मांडला. ते पुढे म्हणाले की, अमृतराय, माधव ज्युलियन, सुरेश भट, सुरेशचंद्र नाडकर्णी, इलाही जमादार ते भीमराव पांचाळे अशी मोठी परंपरा मराठी गझलेत आहे. शहाजहानच्या दरबारातील चंद्रभान या ब्राह्मणाने लिहिलेल्या उर्दू गझलेचाही दाखला त्यांनी दिला. कविवर्य सुरेश भट तर इतक्या सहजपणे गझल लिहीत की तिचे वृत्त सांभाळण्याची कसरत सुरू आहे हे जाणवत नाही. सहजसोप्या शब्दांत परंतु गोळीबंद स्वरूपात भटांची गझल रसिकांना भेटते आणि मनात उतरते.

*ताठ कॉलरींचा ताठा वाकणार आहे,*
*वंचनाच ज्याची त्याला गाडणार आहे*
*किंवा दुष्यंतकुमार लिहितात की,*
*कहाँ तो तय था चरागाँ हर एक घर के लिए।*
*कहाँ चराग मयस्सर नहीं शहर के लिए।।*
*इलाही जमादार हेही अतिशय सशक्त गझलकार होते.*
*हुंदका माझा तसा बंदिस्त आहे।*
*आसवांना लावलेली शिस्त आहे।।*
*राहिला नाही भरवसा पावसाचा।*
*आसवांवरच पिकांची भिस्त आहे।।*
*गिरीश जोशी हे आजचे तरुण गझलकार लिहितात की, जनतेपेक्षा नेता कोणी मोठा नसतो।*
*राजा अपुला सेवक असतो राजा नसतो।।*

अशा अनेक गझलांचे संदर्भ देत विनोद जैतमहाल यांनी मराठी गझलेवर चपखल भाष्य केले.

संमेलनाचे सूत्र हाती घेत गिरीश जोशी यांनी

*हे चुकले का ते चुकले की सारे चुकले आहे*
*नशिबातल्या रेषा नाही,नशीब पुसले आहे*
*तुझा अबोला,रूसवा,फुगवा जीवच माझा घेतो*
*तू रुसल्यावर असे वाटते विश्वच रूसले आहे*
*समोर तू नसताना सारे खावयास जग उठते*
*तू असताना वाटुन जाते सौख्य बरसले आहे*
*तू मोठा की मी मोठा हे ठरवू द्या इतरांना*
*क्षुल्लक प्रश्नाने का इतके वादळ उठले आहे?*
*त्याची कर निर्दोष मुक्तता न्याय देवते अंती,*
*ज्याच्या डोळ्यांमध्ये खारे नीर तरळले आहे.*
*पोटामध्ये मारुन झाला त्रैलोक्याचा दोषी*
*ज्याच्या पदरी मुलगी त्याचे भाग्य उजळले आहे*
*स्वतःच्याच विष्ठेने सारे तोंड भरवल्या जाते*
*लोभाचे वटवाघूळ या हृदयास लटकले आहे*
*सहज कुठे कोणाची होते इच्छांची परिपूर्ती*
*फूल मला आवडले ते काट्यांनी सजले आहे*
*सद्गुण अंगी असणाऱ्याला असेच बक्षीस मिळते*
*चंदनवृक्षाच्या फांदीला विष लटकले आहे*
*दारावरती आलेल्या सौख्याला मी सांगितले*
*सुखा जरासे थांब या घरी दुःख पहुडले आहे*
*या गोठीव इच्छांचा हिमनग वितळत आहे हल्ली*
*ज्याच्या अपूर्णतेने माझे काळीज जळले आहे*
*डोक्यावरती खोटे घेऊन नाचत असते दुनिया*
*दुनियेमध्ये खरे बोलणे कुणास रुचले आहे*
*आमच्या अस्तित्वाचा आम्ही प्रश्न विचारत*
*होतो एका प्रश्नाने का इतके वादळ उठले आहे*

*यानंतर गझलकार राजू आठवले यांनी*

*समजू नकोस नेत्या सत्ता खिशात आहे*
*खूर्ची हिरावण्याची शक्ती मतात आहे*
*आवाज घुंगरांचा ऐकून बाळ निजले*
*कळले असेल त्याला आई फडात आहे*
*हाडांमधून विठ्ठल आवाज येत होता*
*चोखा अजूनही का मग पायऱ्यांत आहे*
*कीर्तन करून सांगे पैशात राम नाही*
*त्याची अता सुपारी लाखात जात आहे*
*एका तुझ्या मिठीने शिणभाग जात होता*
*गोडी कुठे तुझ्याविन आता जगात आहे!*
*हे ओठ चुंबल्यावर लक्षात एक आले*
*इतकी मधाळ गोडी कोठे मधात आहे!*
*व्यवहार शून्य वाटे माझी प्रिया जराशी*
*कित्येक चुंबनांच्या अजुनी ऋणात आहे*

ही गझल सादर करून रसिकांची उत्स्फूर्त दाद मिळवली.

यानंतर गझलकार सोमीनाथ सोनवणे यांनी आपल्या गझलेतून शेतकऱ्यांचे दुःख मांडले...

*तो कधी दुष्काळ होतो पूर होतो!!*
*तो पिकांना जाळतो अन् धूर होतो!!*
*जागतो पावूस इथल्या पेरणीला*
*फार सळसळतो मृगाचा सूर होतो!!*
*कर्जबाजारी असावे शेत अमुचे*
*कर्ज हिरवे वाटतो मशहूर होतो!!*
*पेटते राहो निखारे काळजाचे*
*तो दिव्याची वात अन् कापूर होतो!!*
*लागला जर माल थोडासा घराला*
*बेगडी राजा सदा मगरूर होतो!!*
*दुःख त्याचे जाणले नाही कुणीही*
*बाप अमुचा का असा मजबूर होतो!!*
*नाळ मातीशी कशी जुळली म्हणावी*
*गाडल्या गेला तरी अंकूर होतो!!*

युवा गझलकार ऋषभ कुलकर्णी यांनी आयुष्यावर गझल सादर करून खरी दिवाळी म्हणजे काय हे आपल्या गझलेतून पटवून दिले...

*आयुष्याच्या चार सरी..*
*भिजून घेऊ आज तरी..*
*वळणावरती प्रश्न उभा..*
*रीत खरी की प्रीत खरी ?*
*दोन दिसांचे हे जीवन*
*दरवळतो मी फुलांपरी*
*आनंदाचा उंच गिरी..*
*दुःखाचीही खोल दरी..*
*अजून आहे ओल मनी..*
*भरून आली जखम जरी..*
*तळहाती धरू कवडसे*
*भरेल ओंजळ केव्हातरी*
*नक्षत्रांचे लाव दिवे..*
*परतुन येई सांज घरी..*
*वाटेत सूर्य भेटावा..*
*उजळे दिवा आशेवरी..*
*मदतीचा उजळेल दिवा*
*हीच दिवाळी आहे खरी*

यानंतर गिरीश जोशी यांनी अंधाराचे पाडस ही गझल सादर करून सर्वांच्या मनाचा ठाव घेतला...

*वरवर दिसते तितकी कोठे डोळस आहे*
*दुनिया म्हणजे अंधाराचे पाडस आहे.*
*तुझा नसावा पुर्वज-बिरवज कुणी खेकडा*
*तरी माणसा तुझे चालणे तिरकस आहे.*
*काही इच्छांचा तर आहे पिता खरा मी*
*काही इच्छांचा जत्था बेवारस आहे.*
*येतानाची चाल तुझी धडकीच भरवते*
*जातानाची चाल संकटा..सालस आहे.*
*तिच्याकरीता असेनही मी क्षुल्लक- बिल्लक.*
*माझ्यासाठी अजूनही ती पारस आहे.*
*तिच्याविना मन रमले नाही कधीच माझे*
*राजहंस मी.. 'ती'हि सरोवर मानस आहे.*
*तिला कशाला दुसरी उपमा शोधत बसता*
*तिचा देह तर कमलदलाचा वारस आहे.*
*पत्नी असते आयुष्याची मुख्य गायिका*
*नवरा म्हणजे फक्त मागचा कोरस आहे.*
*येता-जाता मुलाप्रमाणे बिलगत असते*
*सुखाहूनही दुःख केवढे गोंडस आहे!*
*फुटक्या डोळ्याच्या दुनियेला खुपत राहतो*
*तुझा निसर्गा प्रणय केवढा लोभस आहे.*

या रचनांना उत्स्फूर्त दाद मिळाली आणि उत्तरोत्तर हे संमेलन रंगत गेले.

गझल संमेलनाचा अध्यक्षीय समारोप करतांना विनोद जैतमहाल यांनी स्वतःची ही रचना सादर केली.....

*खुर्चीला अधिकाराच्या, पोट एक पण तोंडे दहा*
*एक तोंड मागते चिरीमिरी, दुसरे म्हणे पाजा चहा*
*ज्यांना शिकविली नवी अक्षरे, आवाज*
*उठवण्यासाठी चकार शब्द नाही त्यांचा, पण*
*खाण्यासाठी मोठ्ठा आ*
*चारित्र्यावर सज्जनांच्या, चिखल फेकणे सोपे आहे*
*कधी डोकावून आत पहा, मनात ज़हरी नाग सहा*
*सैनिकांच्या भरवशावर, राजा निवांत राहिला तरी*
*सरदार पळवितो सेनापती, हा नवा इतिहास लिहा*
*खेळताना डावपेच होती, मस्तकाला मुकुटाची*
*आशा चाणक्याने पंख कापले, खाली बसवले*
*अक्षर'शहा' विचारलेल्या प्रश्नांचीच, उत्तरे लिहीत*
*आलो इथवर आम्हास पडले प्रश्न तेव्हा, गुरुजी*
*म्हणाले "गप्प रहा" डाकूंची संख्या वेगळी कधी,*
*मोजावी लागत नाही, बकाल तुमच्या शहरामधले,*
*नेते जरा मोजुनी पहा* या रचनेने सुमारे दोन तास सुरू असलेली ही बहारदार मैफल संपन्न झाली.

# लक्ष्मी पूजन

आधुनिक केसरी

**अश्विनी कृष्ण अमावस्या हा दिवाळीतील दिवसां पैकी दुसरा दिवस आहे. नरक चतुर्दशी प्रमाणे पहाटे लवकर उठून अभ्यांग स्नान करून घरातील देवदेवतांचे पूजन केले जाते. दुपारी मिष्ठांन्न भोजनाचा येथेच्छ आस्वाद घेतला जातो. सणाचा खरा उत्साह संध्याकाळी येतो. देवीची जी महत्त्वाची रूपे मानले आहेत त्यामध्ये एक महालक्ष्मीचे रूप आहे. धन ,संपत्ती , वैभव , याचे प्रतीक म्हणजे महालक्ष्मी आहे .भगवती जगत जननी लक्ष्मीसह सर्व देवांना बळीच्या चाचक कारवासवातून भगवान विष्णू ने मुक्त केल्याचा हा दिवस आहे. विजयोत्सवाचा हा दिवस आपण लक्ष्मीपूजन करुन साजरा करण्याची परंपरा आपल्याकडे आहे.**

चौरंगावर आठ पाकळ्याचे कमळ किंवा अष्टकोनी स्वस्तिक काढून त्यावर लक्ष्मीची प्रतिमा ठेवून तिचे व्यथा सांग पूजन करावे. लक्ष्मीला लवंग, वेलदोडे, खडीसाखर, केसरी दूध, पेढा, धणे, बत्तासे, लाह्या याचा नैवेद्य दाखवला जातो. सायंकाळी हळदी कुंकवाच्या निमित्याने घरोघरी आलेल्या सुवासिनीला लक्ष्मीचे रूप समजून त्यांचे पूजन करून त्यांना प्रसाद दिला जातो. आलेल्या प्रत्येकाने प्रसादाचे वाटप झाल्यानंतर फटाक्यांची आतषबाजी केले जाते .रात्री पुन्हा एकदा स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घेतला जातो. नंतर गायन.. वादन ..वाद्य संगीत.. हास्यविनोदाची मैफल याची रंगत येते .सांस्कृतिक कार्यक्रमाची रंगत रात्री वाढत जाते. सर्व जणांनी या मैफलीचा मनमुराद आनंद घेतल्यावर कार्यक्रमाची सांगता होते....

जैन धर्मातही हा दिवस अतिशय महत्त्वाचा मानला जातो. अश्विन मासातील अमावस्याला रात्री बारा वाजता वर्धमान महावीर यांचे महानिर्वाण झाले होते. ज्ञानाचा संपन्न असा हा दीप त्या दिवशी लोपला.. याची आठवण म्हणून अनेक दीप लावून हा दिवस महावीरांची यथासांग पूजा करून साजरा करण्याची जैन धर्मीयांमध्ये परंपरा आजही कायम आहे .व्यापारी वर्षाचा शेवटचा दिवस.. म्हणून हा दिवस व्यापारी मोठ्या उत्साहात साजरा करतात .नवीन वह्या घेऊन त्यांचे पूजन व्यापारी वर्गामध्ये केले जाते. महावीरांच्या महानिर्वानाला पवित्र विधी मानून वीरनिर्वाण संवत नावाचा नवीन शक त्यांनी सुरू केलेला होता. त्यामुळे व्यापारी वर्गात लक्ष्मीपूजनाला विशेष असे मानाचे ..पवित्र असे स्थान देण्यात आलेले आहे....

अमावस्येच्या दिवशी लक्ष्मी बरोबरच अलक्ष्मीचा विहार देखील सर्वत्र होत असतो. या अलक्ष्मीला आपल्या घरात स्थान मिळू नये म्हणून पूर्वीच्या काळी स्त्रिया सायंकाळी पडघम... वाजवीत असतं. लक्ष्मी देवता ही चंचल देवता आहे. ज्या वास्तुत आरोग्य.. स्वच्छता.. मांगल्य.. प्रकाशाचे वास्तव्य असते त्याच वस्तू महालक्ष्मीच्या वास असतो. म्हणूनच या दिवाळीच्या माध्यमातून घराघरातून स्वच्छता.. रंगरंगोटी.. दिव्यांची आरास ..करून आपली वास्तू.. आपलं घर प्रकाशमान करण्याची परंपरा आहे. त्यामुळे अलक्ष्मी जाऊन आपल्या घरात लक्ष्मीचा वास चिरकाल नांदत राहतो हीच यामागील एक पवित्र अशी संकल्पना आहे...

बंगालमध्ये लक्ष्मीपूजनाच्या दिवशी मातीच्या कालीमातेचे मूर्तीचे पूजन करण्याची परंपरा आजही कायम आहे. भारतात हजारो खेडी आहेत अशा खेड्यामधून विविध ग्रामदेवता आहेत. यमाई, तुकाई, येडाई, भवानीआई, अंबाबाई, जारवाई, रूपाभवानी, शीतलादेवी, अशा देवीचे पूजन करण्याची परंपरा त्या खेड्यात आजही कायम आहे. दक्षिणेकडील भागात कालीयम्मा, मरियम्मा, पोचम्मा, अशा देवीचे पूजन केले जाते. तामिळनाडूमध्ये कांचीची कामाक्षी, मदुरेची मीनाक्षी, यांच्या पूजनाचा समारंभ मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो . तर केरळमध्ये भगवतीची पूजा मोठ्या प्रमाणावर करण्याची पद्धत रूढ झालेली आहे.



सुधीर कोटींकर,
संपर्क क्र. 9765553312

राजस्थानी लोकांनी दिवाळीचा संबंध रामाच्या वनवासाहून परतण्याच्या दिवशी जोडलेला आहे त्यामुळे लंका दहनाचा कार्यक्रम याच दिवशी करतात. मांजरीला लक्ष्मी मानून या दिवशी तिचे विशेष कौतुक करण्याची पद्धती त्यांच्याकडे रूढ आहे. नरक चतुर्थीच्या दिवशी मांजरीनी दूध प्याले तर तिला न मारता उलट शुभ समजले जाते. नरक चतुर्थीला त्यांच्याकडे रूपचौदस असे संबोधले जाते. तर आंध्र प्रदेशात घराबाहेर एक माचाण उभे करतात .त्यावर घरातील स्त्रिया एकत्रित येऊन रात्रीच्या दिवशी गाणी गाण्याची पद्धत त्यांच्याकडे रूढ आहे. दिवसा पुरुष मंडळी रेड्याच्या टकरी लावून पैजा लावतात. विविध राज्यातील लक्ष्मीपूजनाच्या पद्धती अनेक असल्या तरी प्रत्येकालाच लक्ष्मीचा वास आपल्या घरात असावा असे मनापासून वाटत असते ...त्या दृष्टीने प्रत्येक जण अधिक प्रयत्नशील असतो हे बाकी खर.




# नरकचतुर्दशी

आधुनिक केसरी

**दिवाळीच्या या सणाचा खरा आनंद उत्साह ओसंडून जातो तो नरकचतुर्दशीला. मनास अल्हाददायक वाटणाऱ्या त्या उबदार थंडीत भल्या पहाटे आईचे हा कानावर येते.. उठा.. उठा... लवकर उठा. मग आईच्या हाताने सुवासिक तेलाचे.. उटण्याचे सर्वांगाला चांगलं मालिश.. कढत.. कढत.. पाण्याने येथेच्छ अभ्यंगस्नान होतं.. नंतर नवनवीन कपड्यांचा तो सुखावणारा स्पर्श.. फटाक्यांची आताशबाजी.. सूर्योदयापूर्वीच घरातील देवदेवतांचे पूजन ..नंतर ग्रामस्थ देवतांचे आई-बाबांचे ताई बरोबर दर्शन ..नवीन अलंकारांनी सजलेल्या ताई बरोबर जवळच्या नातेवाईकांकडे बाबांच्या.. मित्राकडे.. फराळ.. भेटवस्तू पोहोचवणे.. दिवाळीची ग्रीटिंग मित्र-मैत्रिणींना पाठवणे.. वडीलधाऱ्यांना नमस्कार करुन त्यांच्या आशीर्वादानंतर एका तृप्त मनाने घरी परतणे.या आनंदाच्या अनमोल क्षणांचे वर्णन शब्दांमधून करणे खचितच अवघड आहे हेच खरं...**

आश्विन वैद्य चतुर्दशीचा हा दिवस म्हणजे नरकचतुर्दशी. या विषयीची आख्यायिका अशी आहे ..पृथ्वीपासून जन्मलेला राक्षस नरकासुर हा खूप उन्नत झालेला होता .त्याच वैष्णवास्त्र हे अति शक्तिशाली अस्त्र प्राप्त झालेले होते. भगवान विष्णूने वराह अवतार ज्यावेळी धारण केलेला होता त्यावेळी त्यांनी नारकासुदारचा युद्धात पराभव केला .पण त्यानंतर कृष्ण अवतार झाला ... त्या अवतारात या सगळ्या संकल्पना लोक पावल्या. नरकचतुर्दशी नारकासुरावर श्रीकृष्णाने विजय संपादन केला असेच पुढे संबोधले जाऊ लागले... भागवत संप्रदायातील तसेच विष्णु पुरणातील नारकासुराच्या वधाचे वर्णन अतिशय सुरेखपणे केलेले आहे. प्राग ज्योतिषपूरचा महाराजा नरकासुर होता. त्या वैष्णवास्त्र मिळाल्यानंतर तो उन्नत.. बेबंद झाला. त्याने देवाची अदिती हिचे दाग दागिने हिसकावून घेतले. वरुणाचे छत्र चोरले.. मंदारच्या अमूल्यरत्न भंडाराची त्यांनी लयलूट केली. एवढ्यावरच भागले नाही तर देवतांच्या सर्वांग सुंदर नेताळ क्रांतीच्या स्त्रियावरही त्याची नजर होती. त्यावेळी धर्माच्या सज्जनाच्या रक्षणासाठी भगवान श्रीकृष्णाने कृष्णावतार धारण केला. त्याने नारकासुराच्या राज्यावर स्वारी केली. त्या ठिकाणी घनघोर युद्ध झाले. त्यामध्ये नरकासुराचा वध श्रीकृष्णाने केला. १६ सहस्र १०८ सर्वांग सुंदर स्त्रिया श्रीकृष्णाने त्यांना बंधन मुक्त केले. तो विजयाचा दिवस होता नरकचतुर्दशीचाच होता. या दिवसाची विजयाची आठवण म्हणून नारकचतुर्दशीला अभ्यंगस्नानानंतर कोकणात सर्वत्र ..तर महाराष्ट्रात काही ठिकाणी कारिटांचे फळ नरकार सुराचे प्रतीक म्हणून फोडण्याची लाथेनी चिरडण्याची पद्धत आज प्रचलित आहे. तर काही भागात तर शेणा मातीचा नरकासुर तयार करून त्यावर कचरा टाकून त्याला गाळून घालण्याची प्रथा प्रचलित आहे. पूर्वी एकत्र कुटुंब पद्धती होती. घराघरातून खूप माणसे होती. घरेही खूप मोठे होती. त्यावेळी पहाटे सर्वांची स्नाने तेल उठणे लावून एकत्रितपणे केली जात असत. नंतर कल्पना बदलल्या. धनत्रयोदशीला बायकांचे स्नान व नारक चतुर्दशीला पुरुषांचे स्नान अशी विभागणी सोयीनुसार केली गेली. हीच संकल्पना पुढे रूढ झाली. नारकचतुर्दशीच्या पहाटे सणाचे वेळी अंगाला तेल लावून मालिश करणे.. आयुर्वेदिक वनस्पती पासून तयार केलेले उटणे लावणे .. या संपूर्ण संकल्पनेला आरोग्य शास्त्राच् जोड दिलेली आहे. अश्विनमास संपत आलेला असतो. कार्तिक मासाच्या आरंभामुळे थंडीची चाहूल लागलेली असते .याच थंडीमुळे प्रत्येकाची त्वचा कोरडी पडलेली असते .तडतड होऊन थोडीशी खाज सुटलेली असते. कं अशावेळी सुगंधी कचोरा, वाळा, गुलाब या सुगंधी वनौऔषधी घामाइची दुर्गंधी नष्ट करतात व त्यातील ज्येष्ठमध आवळा अनंतमूळ या स्निग्ध वनस्पतीमुळे त्वचा मऊ होते. त्यामुळेच आज अमेरिका, ऑस्ट्रेलिया, पश्चिम आशिया आणि अरब राष्ट्रातही अभ्यंग स्नानाचे महत्त्व वाढलेले आहे... त्यामुळे खूप मोठ्या प्रमाणावर उटणे निर्यात निर्यात केले जात आहे ..हे नॅचरल स्क्रब या नावाने. याचाच विचार करून आपण आज दैनंदिन जीवनातही ही आरोग्य शास्त्राची संकल्पना अंगीकारली हवीच.. हो ना... ( दि.२४ ऑक्टोबर २२ .. अभ्यंग स्नान पहाटे ५.२० मुहूर्ता पासून पुढे)

# खड्ड्यांमुळेच रेल्वेने केला प्रवास; मंत्री महाजनांची कबुली

आधुनिक केसरी न्यूज



**नाशिक :** खड्ड्यांमुळेच मला वाहनाऐवजी रेल्वेने यावे लागल्याची कबुली देऊन ग्रामविकास तथा वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन यांनी खड्डेमय रस्त्यांची पोलखोल केली. नाशिक-मुंबई महामार्गावरील खड्डे बुजविले नाहीत, तर टोल बंद करण्याचा इशारा देण्यापेक्षा माजी मंत्री छगन भुजबळ यांनी पालकमंत्रिपद असतानाच टोल बंद करायला हवे होते, असा टोलाही त्यांनी लगावला. नाशिक दौऱ्यात महाजन यांनी पत्रकारांशी संवाद साधताना भुजबळांच्या टोल बंद आंदोलनावर टीकास्त्र सोडले. राज्यात रस्त्यांवर सर्वत्र खड्डे पडले असून, याबाबत मी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्याशी चर्चा केली आहे. केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्याशीही बोललो आहे. त्यामुळे लवकरच रस्ते खड्डेमुक्त होतील, असा दावाही त्यांनी केला. शिवसेनेचे सचिव मिलिंद नार्वेकर यांचे गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत चांगले संबंध असून, नार्वेकर सध्या शिवसेनेत नाराज असल्याचा दावाही महाजन यांनी केला. शिवसेनेत कोण नेते राहतील हे आता सांगता येणार नाही, असेही त्यांनी नमूद केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, फडणवीस आणि राज ठाकरे दिवाळीनिमित्त एकत्र आले असले, तरी याकडे राजकारण म्हणून पाहायला नको, असे सांगत राजकारणत काहीही अशक्य नसते, असेही त्यांनी सांगितले. मनसे-भाजप युतीबाबत वरिष्ठ नेते निर्णय घेतील. राजकारणात केव्हाही काहीही होऊ शकते, असे सांगत मनसे-भाजप-शिंदे गटाची युती होऊ शकते, असे संकेतही त्यांनी या वेळी दिले. मुंबई महापालिकेत यंदा भाजपचीच सत्ता येणार असल्याचा दावाही त्यांनी केला.




# सोलापूरच्या पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांची बदली

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** शिंदे फडणवीस सरकारने गुरुवारी 20 ऑक्टोबर रोजी रात्री राज्यातील आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे परिपत्रक जाहीर केले आहे. सोलापूर ग्रामीण पोलीस दलाच्या पोलिस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांची बदली झाली आहे. तेजस्वी सातपुते यांच्या जागी नाशिक पोलीस अकॅडमी मधील शिरीष सरदेशपांडे यांची नियुक्ती झाली आहे. ऑपरेशन परिवर्तनमुळे सोलापूर पोलीस दलाचा उल्लेख लोकसभेत झाला होता, पण खुलेआम सुरू असलेल्या अवैध धंद्यामुळे राज्याच्या विधानसभेत भाजपा आमदारांनी सोलापूर पोलिसांविरोधात लक्षवेधी सूचना मांडल्या होत्या. सातारा येथे दीड वर्षे ड्युटी करून करोना महामारीत पोलिसांसाठी अतिशय कमी वेळेत म्हणजेच 5 दिवसांत जंबो ऑक्सिजन कोविड सेंटर उभा केलेल्या तेजस्वी सातपुते या ऑक्टोबर 2020 मध्ये सोलापूर पोलीस दलाच्या पोलीस अधीक्षक म्हणून रुजू झाल्या होत्या. सोलापूरला रुजू झाल्यानंतर महिलांसाठी विशेष उपक्रम राबविण्यात येतील, अशी चर्चा सोलापूर पोलीस दलात झाली होती. आता ऐन दिवाळीच्या तोंडावर तेजस्वी सातपुते यांची बदली झाली आहे. सोलापूर पोलीस अधीक्षक पदी असताना तेजस्वी सातपुते यांनी दारूभट्ट्यांवर काम करणाऱ्या परिवारासाठी ऑपरेशन परिवर्तन उपक्रम राबविले. बेकायदेशीर रित्या सुरू असलेल्या दारू भट्ट्यांवरील महिलांसाठी रोजगार उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला.



## द वाय चित्रपटाच्या ट्रेलरने केली धूम

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** द वाय चित्रपटाचा ट्रेलर लाखो प्रेक्षकांची मने जिंकत आहे. सायकोलॉजिकल थ्रिलर मोठ्या पडद्यावर पुनरागमन करत आहे.



द वाय ट्रेलर नुकताच रिलीज झाला आहे आणि भारतीय चित्रपट उद्योगात खळबळ माजवत आहे, दक्षिण भारतीय चित्रपट दिग्दर्शक गिरिदेव राज दिग्दर्शित बॉलीवूड चित्रपट, ज्यांच्या याआधी कन्नड झिरो मेड इन इंडिया या चित्रपटाने अनेकांच्या हृदयाला आणि YouTube ला स्पर्श केला होता. 100 दशलक्ष पेक्षा जास्त वेळा पाहिले गेले. नुकतेच झी म्युझिकने द वाई चित्रपटाचे गाणे रिलीज केले आणि अनेक प्रेक्षकांना प्रभावित केले. राजश्री प्रॉडक्शन ज्याने मैने प्यार किया, हम आपके है कौन, हम साथ साथ हैं, प्रेम रतन धन पायो आणि बिग बी स्टारर उचाई यासारखे काही हिट चित्रपट दिले आहेत. त्यांच्या चॅनलवर Y ट्रेलर, आणि ट्रेलरला अक्षय कुमार, गोविंदा, पियुष मिश्रा, जगन शक्ती, शोनाली बोस, निखिल द्विवेदी, जी अशोक यांसारख्या प्रख्यात चित्रपट निर्माते आणि अभिनेत्यांकडून भरपूर प्रशंसा मिळाली आणि अनेकांनी चित्रपटाच्या सामग्री आणि गुणवत्तेचे कौतुक केले. , तरण आदर्श, विरल भयानी, मानव मंगलानी यांसारख्या भारतातील शीर्ष समीक्षकांनी आणि बॉलीवूड नाऊ, वूमप्ला, इन्स्टंट बॉलीवूड यांसारख्या शीर्ष चॅनेलने ट्रेलर लॉन्च झाल्यानंतर काही मिनिटांत ते शेअर केले आहे. प्रेक्षकांना आकर्षित करण्यासाठी सामग्री सादर करण्याच्या अशा संभाव्य आणि अद्वितीय पद्धतीप्रमाणे दिसते.
या चित्रपटाची निर्मिती रॉकेट फिल्म्सच्या बॅनरखाली करण्यात आली असून मधु जी एम आणि डॉ अजित यांनी निर्मिती केली आहे. ट्रेलर केवळ त्याच्या अनोख्या आशयामुळेच नाही तर डीओपी कार्तिक मल्लूरने टिपलेले अप्रतिम व्हिज्युअल, क्रिस्टोफर जेसनचे मनमोहक संगीत आणि केजीएफ चित्रपट तंत्रज्ञ एल सतीश कुमार यांचे डॉल्बी मिक्सिंग यामुळे चर्चेत आहे. मोठ्या प्रमाणात. मदत केली. , कलाकारांबद्दल सांगायचे तर, त्याने या विषयासाठी अतिशय सूक्ष्म अभिनय केला. युवान हरिहरन हा रोशन तनेजा शाळेचा माजी विद्यार्थी आहे, अभिनेता कमल घिमिरे ज्युली-2, तारक मेहता का उल्टा चष्मा यासारख्या चित्रपटांमध्ये अभिनेता ही भूमिका उत्कृष्टपणे साकारली आणि लिओनिलाने पदार्पण केले. दिग्दर्शकाची दृष्टी अगदी स्पष्ट आहे. तो म्हणतो शैली सार्वत्रिक असल्याने आणि सर्व वयोगटातील प्रेक्षकांना आकर्षित करू शकत असल्याने, दिग्दर्शकांनी ही संकल्पना आणली आहे आणि कलाकारांना न्याय न देता प्रेक्षकांना रोमांचित ठेवण्यासाठी हुशारीने कास्ट केले आहे. मुख्य भूमिकेत एका मूक मुलीचा अभिनय सर्वसाधारणपणे, प्रत्येक पात्र चित्रपटातील स्वतःच्या मार्गाने खरे तर अद्वितीय आहे. चित्रपटाचा मूड प्रेक्षकांचे लक्ष विचलित होऊ देत नाही आणि त्यांना भावनांमधून बाहेर काढत नाही. यामुळे त्यांना एक परिपूर्ण रोलर कोस्टर राईड मिळते. साऊथचे सिनेमे बेंचमार्क बनवत आहेत आणि अलीकडच्या काळातले सगळे रेकॉर्ड मोडीत काढत आहेत. Y लवकरच संपूर्ण भारतात पडद्यावर येण्यासाठी सज्ज आहे. चित्रपटाचा ट्रेलर खूपच आशादायक आहे आणि विक्रम वेधा, PS1 आणि गॉडफादरसह चित्रपटगृहांमध्ये आधीपासूनच चालू आहे.
“द वाय” चित्रपटाचा ट्रेलर व्हिडिओ लिंक :-
https://youtu.be/PoJMTEVOGtY

## एसटीचे २४ तास तिकीट आरक्षण; ६५० गाड्यांसह जादा बसेसही सज्ज

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** दिवाळीत बसप्रवास सुखाचा आणि आरामदायी व्हावा याकरिता राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नाशिक विभागाने २४ तास तिकीट आरक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी जादा बसेसदेखील उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. महामंडळाच्या ताफ्यात ६५० बसेस असून, गर्दीचा अंदाज घेऊन जादा बसेसची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती महामंडळातील अधिकाऱ्यांनी शुक्रवारी दिली. यंदा निर्बंधमुक्त वातावरणात धूमधडाक्यात दिवाळी साजरी करण्याची तयारी सर्वांनीच केली आहे. करोना संसर्गाच्या सावटामुळे सलग दोन वर्षे अनेकांना दिवाळी सणासाठी गावी जाणेही शक्य होऊ शकले नाही. त्यामुळे यंदाची दिवाळी गावी नातलग आणि स्नेहीजणांसोबत साजरी करण्याचे नियोजन नागरिकांनी केले आहे. स्वतःची वाहने नसलेल्यांसाठी गावी जाण्याकरिता राज्य मार्ग परिवहन महामंडळाची एसटी हेच हक्काचे साधन असते. त्यामुळे शहरातील ठक्कर बसस्थानक, जुने सीबीएस बसस्थानक, नाशिकरोड बसस्थानकासह जिल्हाभरातील बसस्थानकांमध्ये त्या त्या भागातील प्रवाशांची गर्दी उसळते. बसेसच्या तुलनेत प्रवाशांची गर्दी अधिक असल्यास अनेकांना उभे राहून प्रवास करावा लागतो. दिवाळी हंगामात गर्दीमुळे होणारी गैरसोय टाळण्यासाठी नागरिकांनी तिकीट आरक्षित करून प्रवास करावा, असे आवाहन एसटी महामंडळाने केले आहे. याकरिता नवीन सीबीएस (ठक्कर) बसस्थानकात २४ तास तिकीट आरक्षण कक्ष सुरू ठेवण्यात आल्याची माहिती विभागीय वाहतूक अधिकारी कैलास पाटील यांनी दिली.

## एनआरआय महिलेची ८५ लाखांची फसवणूक; खोट्या केसची धमकी देत लुटले

**नाशिक :** मूळ नाशिकच्या असलेल्या पण काही वर्षांपासून अमेरिकेतील वॉशिंग्टनमध्ये स्थित असलेल्या महिलेला ठाण्यातील एकाने गंडा घातला आहे. एक्स्पोर्ट व्यवसायात गुंतवणूक केल्यावर चांगला परतावा देतो, असे सांगत एका जमिनीचे खोटे दस्ताऐवज संशयिताने या महिलेला दिले. ‘एनआरआय’ महिलेची ८५ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी संशयित गुल रुपचंद क्रिपलानी (रा. कुलाबा) याच्याविरुद्ध गंगापूर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. गंगापूररोड परिसरातील उदयनगरात स्मिता संदीप वडेरा (वय ४९) यांचा बंगला आहे.






# महाराष्ट्रातून मान्सूनची अखेर माघार मुंबई, पुण्यासाठी हवामान विभागाचा अंदाज काय सांगतो?

आधुनिक केसरी न्यूज


**मुंबई :** पावसाने जाता-जाता शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेला घास हिरावून घेतला आहे. महाराष्ट्रातील अनेक भागांत परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. राज्यातील अनेक भागांत तो ढगफुटीसारखा कोसळला. पिकांचे अतोनात नुकसान झाले. मान्सूनच्या अखेरच्या शेतकऱ्यांना मोठे नुकसान सोसावे लागले आहे. मात्र, आता अखेर मान्सूनने महाराष्ट्रातून एक्झिट घेतली आहे. महाराष्ट्रातून परतीचा मान्सून माघारी फिरण्यासाठी अनुकूल वातावरण झाले आहे. त्यामुळं २२ ऑक्टोबरनंतर महाराष्ट्रात पावसाची शक्यता नसल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. नैऋत्य मोसमी पावसाने आज महाराष्ट्र, पुणे, मुंबई येथून माघार घेतली आहे, असे हवामान विभागाने म्हटलं आहे. येत्या २४ तासांत कोकणातील एक, दोन स्थानके वगळता राज्यात बहुतांश ठिकाणी पावसाची नोंद नसल्याचंही हवामान विभागानं म्हटलं आहे.

## किड्यांमुळे २० ते २५ गाड्या घसरल्या

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** कोल्हापुरातील शिरोली येथे अंगावर काटा आणणारा व्हिडिओ समोर आला आहे. येथे उजेडाला आकर्षित होणाऱ्या किड्यांमुळे एक दोन नव्हे तर तब्बल २० ते २५ गाड्या स्लिप झाल्याचा प्रकार घडला आहे. तर एका व्यक्तीची गाडी कारच्या समोरच स्लिप झाल्याने तो कारच्या चाकाखाली आला आणि जवळपास १० फुटांपर्यंत फरफटत गेला.
मात्र, केवळ दैव बलवत्तर म्हणून तो त्यातून बचावला. विशेष म्हणजे त्याला यामध्ये कोणतीही गंभीर इजा झाली नाही. पंचगंगा नदीवरील पुलावर शिरोली येथे हा प्रकार घडला. कोल्हापुरात सध्या परतीचा पाऊस सुरू आहे आणि यावेळी रात्रीच्या सुमारास उजेडाला आकर्षित होणारे किडे मोठ्या प्रमाणात रस्त्यावर फिरत आहेत. यामुळे अनेक वाहन चालकांना याचा त्रास होत असून काल रात्रीच्या सुमारास पंचगंगा नदीवरील पुल येथे धक्कादायक घटना घडली आहे. रात्रीच्या सुमारास उजेडाला आकर्षित होणाऱ्या किड्यांमुळे एक दोन नव्हे तर तब्बल २० ते २५ गाड्या स्लिप झाल्या. इतकेच नव्हे तर एका तरुणाची गाडी स्लिप झाल्याने सदर तरुण एका कार खाली आला आणि तब्बल १० फुटांपर्यंत फरफटत गेला. मात्र, केवळ दैव बलवत्तर म्हणून तो त्यातून बचावला. मात्र, त्याला मोठ्या प्रमाणात दुखापत झाली आहे.

## आता बोलबाला स्वदेशी वस्तूंचाच



आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** दिवाळसणाच्या प्रकाशाने बाजारपेठा उजळल्या आहेत. रात्री उशिरापर्यंत बाजारांमध्ये गर्दी दिसून येत आहे. खरेदी-विक्री जोरात असतानाच यंदा चीनच्या वस्तू कमी प्रमाणात आल्या असून याऐवजी स्वदेशीचा बोलबाला आहे. मुख्य म्हणजे गेल्या काही वर्षांत ग्राहकांमध्ये जागरुकता निर्माण झाल्याने स्थानिक उत्पादनांना पसंती मिळत आहे.
दिवाळीला घर सजविण्यासाठी लागणारी लायटिंग, आकाशदिवे, तोरण, कृत्रिम फुले, इलेक्ट्रिक दिवा, रंग बदलणारी व डीम होणारी लायटिंग आदींवर काही वर्षांपूर्वीपर्यंत चीनचा ताबा होता. मागील काही वर्षांत स्वदेशी जागरण मंच, अखिल भारतीय किरकोळ व्यापारी महासंघ तसेच विविध व्यापारी आणि ग्राहक संघटनांद्वारे स्वदेशी उत्पादनांबाबत जागरुकता पसरविण्यात येत आहे. त्याचे परिणाम यावर्षी प्रकर्षाने दिसून येताहेत. बाजारात मोठ्या प्रमाणात स्वदेशी उत्पादने आली आहेत. त्यांची विक्री जोरात सुरू आहे. विशेषतः लायटिंगचा विचार करता चीनच्या मक्तेदारीला मोडण्यात यश आले आहे. गलवान संघर्षानंतर ग्राहकांनी मेड इन इंडिया लायटिंगला पसंती मिळाली आहे. सुमारे एक हजार कोटींच्या या बाजारपेठेवरील चीनचे वर्चस्व कमी करण्यासाठी स्थानिक उत्पादक कार्यरत आहेत. याबाबत अधिक सांगताना अखिल भारतीय किरकोळ व्यापारी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बी. सी. भरतिया म्हणाले, ‘मेक इन इंडियाचे चांगले परिणाम दिसून येताहेत. आम्ही दरवर्षी स्वदेशी उत्पादनांच्या विक्रीसाठी अभियान राबवायचो. यावर्षी तसे अभियान राबविण्याची गरजच पडली नाही. यावरून स्वदेशी उत्पादने बाजारपेठांमध्ये मुबलक उपलब्ध असल्याचे दिसून येत आहे. दिल्ली येथून स्वस्त आणि चांगल्या दर्जाची उत्पादने आलेली आहेत. स्थानिक उत्पादने घेण्यास ग्राहक उत्सुक आहेत.’ स्वदेशी जागरण मंचच्या राष्ट्रीय परिषदेचे सदस्य धनंजय भिडे म्हणाले, ‘ग्राहकांमध्ये स्वदेशी, स्थानिक उत्पादनांबाबत जागरुकता निर्माण झाली आहे. दिवाळीनिमित्त ऑनलाइन शॉपिंग करणाऱ्यांची संख्या साधारणपणे पाच टक्के असून त्याचा फारसा प्रभाव पडलेला नाही. उलट प्रत्यक्ष बाजारात गर्दी आहे.’







# शेतकऱ्यांचे निघाले दिवाळीतच दिवाळे

## परतीच्या पावसाने पिकांचे नुकसान पंचनामे न केल्यास शेतकरी आंदोलनाच्या तयारीत

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**वैजापुर :** तालुक्यातील लोणी परिसरासह जिल्ह्यात परतीच्या पावसामुळे कपाशी सोयाबीन मका पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. परतीच्या पावसाने शेतकर्‍यांच्या हाता तोडांशी आलेला घास हिरवला आसुन आहे यावर्षी खरीप पिकांसाठी पावसाची आत्तापर्यंत चांगला प्रतिसाद मिळाला आसला तरी आता हाती आलेले पिक वाया जाते का काय? अशी भीती शेतकर्‍यांमध्ये निर्माण झाली आहे. जगाचा पोशिंदा म्हणून ओळख असणारा शेतकरी राजा स्वतःच एकवेळच्या जेवणासाठी आज मोहताज झालाय.त्याच स्वैरसुतक गोरगरिबांचे कैवारी, बुलंद आवाज म्हणवून घेणाऱ्या राजकीय नेते मंडळींना नाही. सत्तेच्या सारिपाटावर खुर्ची की मिरची म्हणत एकमेकांच्या जिरवा-जिर्वीचा डाव मांडून खेळण्यात ते दंग आहेत.ईतके दिवस उलटत आले तरी शासनाच्या लालफितीच्या कारभारात बळीराजा मात्र ओला दुष्काळ कधी जहिर होतो या सरकारच्या निर्णयाकडे डोळे लावून बसला आहे. आठ दिवसांपासुन परिसरात ढगाळ वातावरण निर्माण झाल्याने मका सोंगणीसाठी शेतकरी आणी मजुरांमध्ये लगबग सुरू होती मात्र झालेल्या पावसाने सोंगणी केलेली मका व चारा भिजल्याने शेतकर्‍यांचे नुकसान झाले आहे परीसरातील आनेक शेतकरी शेतीसह पशुपालन मोठ्या प्रमाणात करतात मकाचा चारा जनावरांसाठी वापरला जातो परंतु झालेल्या पावसाने हा चारा पुर्ण पणे भिजवून निकामी झाला आहे.त्यामुळे भविष्यात चारा टंचाईच्या संकटाला सामोरे जावे लागणार असल्याचे चित्र ग्रामीण भागात दिसत आसुन शेतकर्‍यांचे निघाले दिवाळे निघाले आहे. दिस जातील दिस येतील ,भोग सरल सुख येईल..! या उक्तीप्रमाणे आशावादी राहून अपार कष्ट करत राहिला.पण यंदाच्या पावसामुळे शेतकरी हवालदिल झाला आसुसून अच्छे दिनाचे त्यांचे स्वप्न समाजकारणाच्या नावावर राजकारण करणाऱ्या नेतेमंडळीमुळे स्वप्न भंगले आसुन हजारो हेकटर क्षेत्र उध्वस्त होण्याच्या मार्गावरआहेत, तरी मायबाप सरकार म्हणून ज्यांच्याकडे याचना करायची तीच मंडळी सत्ता-सुंदरीच्या नादात एकमेकाना वाकुल्या दाखवू लागली आहे.हीच मंडळी राजकीय डावपेच आखण्यात व्यस्त असल्याने सरकारच्या ठिसाळ नियोजनाचा फटका शेतकर्यांना बासत आहे. शेतकरीवर्ग नैराश्यग्रस्त आसुन या कुषी प्रधान देशात शेतकर्यावर आत्महत्येची वेळ यासारखी दुर्दैवी गोष्ट कोणती आहे. असा संतप्त सवाल राज्यातील तमाम जनतेचा आहे.त्यांच्या तोंडातून एकच संतापजनक प्रतिक्रिया आहे' तुमचं होतंय राजकारण मात्र आमचं चाललंय मरण..!



# मतभेद विसरून सर्वपक्षीय नेत्यांचा 'दिवाळी फराळ'

आधुनिक केसरी न्यूज



**पिंपरी-चिंचवड :** शहरातील सर्वपक्षीय दिग्गज नेत्यांनी नेहमीचे हेवेदावे बाजूला ठेवून रविवारी (२३ ऑक्टोबर) एकत्रितपणे दिवाळी फराळाचा आनंद घेतला. खेळीमेळीच्या वातावरणात दोन तास रंगलेल्या या गप्पांच्या मैफलीत विविध क्षेत्रातील मान्यवरही सहभागी झाले होते. दिशा सोशल फाउंडेशनच्या वतीने काळेवाडी येथील 'रागा पॅलेस' या ठिकाणी दिवाळी फराळ उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार अमर साबळे, माजी मंत्री बाळा भेगडे, आमदार अण्णा बनसोडे, पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, प्रसिध्द निवेदक सुधीर गाडगीळ, वनराईचे अध्यक्ष रवींद्र धारिया, मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराजराजे भोसले, अर्जून पुरस्कार विजेते खेळाडू शांताराम जाधव, नाट्य परिषदेचे शहराध्यक्ष भाऊसाहेब भोईर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचीव सचिन साठे, काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास कदम, शिवसेनेचे शहराध्यक्ष सचिन भोसले, मनसेचे शहराध्यक्ष सचिन चिखले, भाजप नेते शंकर जगताप, कार्तिक लांडगे, माजी महापौर संजोग वाघेरे, राहूल जाधव, नितीन काळजे, पिंपरी प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी उपमहापौर राजू मिसाळ आदींनी हजेरी लावली.



# करोडीत गरजूंना किराणा किट वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**करोडी :** जय शिवशंभु प्रतिष्ठाण संचलित करोडी गावात आनंदाची दिवाळी निम्मीत किराणा किट वाटप करण्यात आली. हिंन्दुधर्मातील दिवाळी सर्वात मोठा ऊत्सव असतो त्यानिम्मीताने ज्या कुटुंबाची गरिबी आहे, जे गरजू नागरिक आहे अश्या परीवाराला किराणा किट दिवाळी भेट म्हणून वाटप करण्यात आली त्या निम्मीताने करोडी गावातील नागरीक ऊपस्थीत होते !! मंगेश जाधव, ऋषीकेश जाधव, भारत जाधव, गंगाधर पर्हाड, रामनाथ नवले, रामभाऊ गडगुळ, ज्ञानेश्वर जिते, कार्तीक जाधव, देविदास गडगुळ, साहेबराव जाधव, कडुबाळ जाधव, भाऊसाहेब दाणे, योगेश गडगुळ, भिमा दंवडे, गौतम सोनवणे, बापू दादा दवांडे, गोकुळ जाधव, बाळु जाधव, सोमेश गोल्हार, कल्याण जाधव , मंगेश शेंगोळे, सुरेश शिंदे, देविदास जाधव, अमोल जाधव, मुरलीधर जाधव, नारायण जाधव, पर्मेशोर गडगुळ, उध्दव गडगुळ, व ईतर करोडी ग्रामस्थ ऊपस्थीत होते.

# कारखान्याचे माजी व्हाईस चेअरमन ॲड. कृष्णा पाटील जाधव यांच्या प्रयत्नाला यश



आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** श्री हिराजी महाराज शेतकरी सहकारी साखर कारखाना (वि नोंदणी कृत) म. पिशोर येथील नाचनवेल आणि पिशोर परिसरातील भागधारक शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी त्यांचे हक्काची भाग भांडवलाची रक्कम परत मिळाली, सदरचा कारखाना मिळकत नुकतीच शासनाने विक्री केली. त्यामुळे पिशोर परासरातील ज्येष्ठ नेते व सदर कारखान्याचे माजी व्हाईस चेअरमन ॲड. कृष्णा पाटील जाधव, यांनी शासनाकडे वेळोवेळी निवेदने देऊन व सहकार आयुक्त, पुणे, प्रादेशिक सहसंचालक (साखर), औरंगाबाद, जिल्हाधिकारी, औरंगाबाद, उपविभागीय अधिकारी, कन्नड, तहसीलदार, कन्नड यांच्याशी वेळोवेळी चर्चा करून व शेवटी दिनांक 16 9 2022 रोजी आमरण उपोषणाची नोटीस देऊन हा शेतकऱ्यांचा प्रश्न ऐरणीवर आणला, त्यामुळे प्रशासनाने तातडीने कारवाई करून घाटमाथा व नागद परिसरातील भागधारक शेतकऱ्यांना त्यांचे भाग भांडवल परत करण्याचा निर्णय घ्यावा लागला. वरील परिसरात दिनांक 22 9 2022 पासून सदर शेतकऱ्यांचे भाग भांडवल धनादेशाच्या माध्यमातून त्या शेतकऱ्यांना परत करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून जवळपास पिशोर परिसरातील, हसता, मेहेगाव, तपोवन, निंभोरा, वासडी, देवपूळ, नादरपूर, पिंपरखेडा, भिल्लदरी, गौर पिंपरी, लालवन, नायगाव, वावना, हिवरा, कान्हेगाव, डोंगरगाव, मोहरा, टाकळी शाहू, आडगाव, नाचनवेल, अहमदाबाद, गो मोहाडी ई. गावी वाटप पूर्ण झाले असून त्यामुळे या परिसरातील भागधारक शेतकऱ्यांची दिवाळी गोड झाली आहे, मागील काही वर्षाच्या तपस्या नंतर श्री जाधव यांच्या प्रयत्नाला यश मिळाल्या मुळे परिसरात शेतकरी आनंदात असून ते संबंधित अधिकारी शासकीय अभिहस्तां किती, हिराजी महाराज कारखाना व मा. ॲड. कृष्णा पाटील जाधव यांना मनापासून धन्यवाद देत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. तसेच छायाचित्रात शासकीय अभिहस्ताकिती, हिराजी महाराज शेतकरी सहकारी साखर कारखाना, पिशोर व कामगार सचिव लाल मिंया शहा तसेच मौजे नादरपूर येथील प्रतिष्ठित नागरिक बाबू नाना निकम व अन्य गावकरी धनादेश स्वीकृत करताना दिसत आहेत.

दिवाळीच्या सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा
ग्रामपंचायत कार्यालय अनाड
तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद
रामकोरबाई तोताराम बिरारे (सरपंच)
प्रवीण तुकाराम जाधव (उपसरपंच)
सुनिल पाटील (ग्रामसेवक)
सन्मानीय सदस्य
भागवत शेनफड शिंदे, गजानन देवराव गदाई,
मनिषा संदीप मानकर, प्रिया निलेश पवार, शितल भरत पवार
व समस्त गांवकरी मंडळी, अनाड

आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार



- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद



# एक हात मदतीचा

आधुनिक केसरी न्यूज

**लासूर स्टेशन :** 05 नोव्हेंबर 2022 ला सरपंच संजय भाऊ पांडव यांचा वाढदिवस आहे अगदी दिवाळी तोंडावरती आलेली असताना अतिवृष्टीमुळे मक्का, कापूस, सोयाबीन पिकाचे अतोनात नुकसान झाले. कापसांचे बोंड अक्षरशा सडले आहेत शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने फुलवलेल्या शेत शिवारावर अस्मानी संकटाने कहर केला आहे.हातात तोंडाशी आलेल्या पिकांचे डोळ्या देखत परतीच्या पावसामुळे नुकसान झाले. शेतकरी पूर्णपणे कोलमडून गेला अशा स्थितीत या शेतकरी बांधवांना एक हात मदतीचा सरपंच संजू भाऊ पांडव यांनी दिला... संजू भाऊ पांडव यांनी स्वतःच्या वाढदिवसाच्या सर्व खर्च टाळून अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकरी बांधवांसाठी तसेच गोरगरीब वय वृद्ध विधवा महिलांना आज दिवाळीच्या पूर्वसंध्येला 101 परिवाराला किराणा किट ची मदत करण्यात आली. त्या प्रसंगी सरपंच मिना संजय पांडव, माजी सरपंच बंडू नाना भुजबळ, धमोरीचे उपसरपंच रवी भाऊ चव्हाण,ग्रामपंचायत सदस्य राजू भाऊ गायकवाड प्रकाश कोकरे, कल्याण दादा पवार, सोपान बोरकर, अशोक सौदागर, विक्की मढिकर, भगवान गाढे, (भा, ज,पा, यू, मो, जिल्हा उपाध्यक्ष) अमोल जाधव, विजय पांडव, अनिल पांडव,शिवाजी प्रधान, छोटू पठाण,अम्मू शेख, कल्पेश गायकवाड, लक्षीमन सोनवणे, सिकंदर शहा, खलिल शहा, संजय पवार, किशोर पवार, योगेश तायडे, दत्तू पवार, सागर लढे, अमोल कळमकर, मनोज पवार, सुरेश वरपे, गणेश परहाड, नारायण जाधव, आलीम हे उपस्थित होते.

# वांबोरीत पाडवा पहाट कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**वांबोरी :** सूरमयी पाडवा पहाट.., सांज पाडवा मैफली.. अन् त्यांना दाद देणारे कानसेन.. हे समीकरण अलीकडे चांगलेच दृढ आहे. यंदा वांबोरी (ता.राहुरी) येथील श्री विठ्ठल मंदिरात पाडवा पहाट कार्यक्रमाचे 26 रोजी आयोजन करण्यात आले आहे,अशी माहिती वांबोरी कला महोत्सवाचे अध्यक्ष निवृत्ती पाटील यांनी दिली.यंदा पाडवा आणि भाऊबीज एकाच दिवशी असल्याने हा दिवस शब्दसूरांनी व भक्तीमय गोष्टी व अभंगांनी सजणार आहे. सांस्कृतिक वातावरणात भर टाकणाऱ्या मैफलींमध्ये पाडवा पहाटचा महत्त्वाचा वाटा आहे. पाडवा पहाट सांस्कृतिक वर्षाची नव्याने सुरुवात करणारा उत्सव आहे.पाडवा सणाच्या निमीत्ताने वांबोरीच्या विठ्ठल मंदिरात पहाटे साडेपाच वाजता ह.भ.प.ईश्वर महाराज कदम यांचे जाहीर किर्तन होणार असून त्यांच्या समवेत बालवारकरी व ज्ञानाई वारकरी संस्था सोबतीला असणार आहेत.






# मराठा प्रतिष्ठानतर्फे पोलीस स्टेशनला संगणक संच भेट

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** घोसला येथील रहिवाशी तसेच मराठा प्रतिष्ठानचे संथापक समाजसेवक सोपान गव्हांडे यांच्या तर्फे सोयगाव पोलीस स्टेशनला रविवारी (दी.२३) प्रिंटर्ससह संगणक संच भेट देण्यात आला. यावेळी सहायक पोलिस निरीक्षक अनमोल केदार यांना सोपान गव्हांडे यांनी संगणक संच सुपूर्द केला. यावेळी पंचायत समितीचे माजी उपसभापती चंद्रकांत पाटील, मराठा प्रतिष्ठान जिल्हा अध्यक्ष विजय काळे, सरपंच गणेश गवळी, ज्ञानेश्वर वाघ, ग्रा. पं. सदस्य सोनू तडवी व पोलीस जमादार चंद्रकांत दौड व पोलीस नाईक विनोद सपकाळ आदींची प्रमुख उपस्थिती होती.




# सोयगाव ते गिरडा मार्गे बुलढाणा बस फेरी पर्यायी मार्गाने सुरु करा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा परिसरातील टिटवी, देव्हारी, डाभा, नादांतांडा व सावळदबारा या ग्रामीण भागातील शेकडो विद्यार्थी, विद्यार्थिनी,रुग्ण, कर्मचारी हे दररोज बुलढाणा येथे शाळा, दवाखाना,महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था शिक्षण घेण्यासाठी जातात तरी या विद्यार्थ्यांना येण्या जाण्याचे साधन हे फक्त लालपरी (बस) आहे.पण मागील काही दिवसांपासून या ग्रामीण भागात ढगफुटीमुळे अतिवृष्टी झाल्याने गिरडाघाट पुर्णतः खराब झाला असल्याने त्याची दखल बुलढाणा सार्वजनिक बांधकाम विभागाने घेऊन तो घाटातील रस्ता चांगल्याप्रकारे डांबरीकरण करून दिला असला तरी या भागातील काही रस्त्याचे जास्तीत जास्त नुकसान झाले आहे.या भागातील नागरीकांच्या तक्रारीनुसार फर्दापूर सार्वजनिक बांधकाम विभागाने सुद्धा खराब झालेल्या रस्त्याचे काम सुरू केले आले आहे. आणि लवकरच डांबरीकरण सुद्धा होईल असे आश्वासन सुद्धा सार्वजनिक बांधकाम विभागाचे इंजिनिअर राठोड यांनी सांगितले आहे.मात्र या भागातील नागरिकांना बुलढाणा जाण्यासाठी एकही बस नाही आणि बुलढाणा ते सावळदबारा केवळ ३५ किलोमीटर अंतरावर आहे. औरंगाबाद जिल्हा सावळदबारा येथून १५० किलोमीटर अंतरावर आहे तर बुलढाणा ३५ कि.मी.तसेच सावळदबारा हे गाव चक्रधर स्वामीचे तिर्थक्षेत्र म्हणून राज्यात प्रसिद्ध आहे. पण बुलढाणा जाण्यासाठी बसच नाही याकरिता हि बस सोयगाव,सावळदबारा,गिरडाघाट मार्ग बुलढाणा चालू करण्यात यावी असे निवेदन अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अरुणभाऊ चव्हाण, चेतन राठोड तालुका अध्यक्ष, गोकुळसिंग राजपूत तालुका अध्यक्ष सोयगाव यांनी सोयगाव आगार प्रमुख हिरालाल ठाकरे याकडे दि.२२/१०/२२ शनिवार रोजी देण्यात आले आहे. या आगारा तर्फे या वरील बाबीकडे गांभीर्याने लक्ष देऊन दखल घ्यावी तसेच लवकर बस सोयगाव ते बुलढाणा या मार्गावर चालू करावी असे निवेदनात म्हटले आहे यावेळी सरपंच ज्ञानेश्वर वारांगणे मोलखेडा, रा.काँग्रेसचे सुनील माकोंडे,उपसरपंच मो.आरिफ मो.लुखमान व अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# हर घर जल योजनेच्या माध्यमातून सर्वांना शुद्ध पाणी

## राजूर येथे पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन; ना.रावसाहेब पाटील दानवे

आधुनिक केसरी न्यूज

**राजूर :** अशुद्ध पाणी पिल्याने अनेक आजार जडतात.त्यामुळे आरोग्यावर परिणाम होऊन उपचारासाठी बराच खर्चही करावा लागतो. यातून सर्वसामान्य माणसांची सुटका व्हावी म्हणून देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदींजींचे स्वप्न आहे की प्रत्येक भारतीयांस पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळाल्यास लोकांचे आरोग्य सुधारू शकते या संकल्पनेतून हर घर जल योजनेंतर्गत भविष्यात प्रत्येकास पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळणार असल्याचे मत केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री ना. रावसाहेब पाटील दानवे यांनी व्यक्त केले.राजूर येथे जलजीवन अभियानांतर्गत बाणेगाव ते राजूर नवीन पाणीपुरवठा योजना व जलकुंभाचे भूमिपूजन ना.दानवेंच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून सौ.निर्मलाताई दानवे आ.संतोष पाटील दानवे,आ.नारायण कुचे,कार्यकारी अभियंता श्री रबडे'भाजपा जेष्ट नेते शिवाजीराव थोटे, सुधाकरराव दानवे,सरपंच भाऊसाहेब भुजंग,उपसरपंच विनोद डवले,ग्राम पंचायत सदस्य मुसा सेठ सौदागर, माजी जि.प.सदस्य रामेश्वर सोनुने,ग्राम पंचायत सदस्य राहुल दरख,आप्पासाहेब पुंगळे, विष्णू राज्यकर,माजी सरपंच शिवाजीराव पुंगळे,सहकार बोर्ड अध्यक्ष बाबुराव खरात , माजी सभापती गजानन नागवे, रामलाल चव्हाण,गणेश मामा साबळे, तंटामुक्ती अध्यक्ष श्रीरामपंच पुंगळे, संतोष मगरे, भगवानराव नागवे,व्यापारी संघटना अध्यक्ष राम पारवे, जेष्ठ पत्रकार श्यामराव पुंगळे, शिवाजी बोर्डे, संजय पुंगळे,दीपक पारवे,जगन्नाथ थोटे, मेस्टा जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर पुंगळे, बाळू मापारी,रतन शेठ ठोंबरे मधुकरराव तांबडे, आशाताई माळी,शोभाताई मतकर,योगिताताई दानवे, लक्ष्मीबाई खरात,प्रतिभाताई भुजंग,ग्राम पंचायत सदस्या जिजाबाई मगरे,सुशिलाबाई भुजंग,संगीताताई पुंगळे, अनिताताई पुंगळे,रामबाई जगताप,ताईबाई मगरे,लहानुबाई मगरे,चंद्रकलाबाई जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना ना.दानवें म्हणाले की प्रत्येकाला दररोज ५५ लिटर पाणी मिळाले पाहिजे हे हरघर जल योजनेचे उद्दिष्ट आहे. या दृष्टीने जलजीवन अभियानाची अंमलबजावणी चालू आहे.राजूर हे आता गाव राहिले नसून ते एक नवीन शहर म्हणून उदयस येत आहे.त्यामुळे पुढील पंचवीस वर्षाचा विचार करूनच योजना निर्माण केल्या जात आहेत. राजूरसाठी पाणीपुरवठा योजना व जल कुंभाची मागणी बऱ्याच दिवसांपासून होती ती आज पूर्ण होत आहे.माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळातही ४८ लक्ष रुपये निधी खर्चून बाणेगाव प्रकल्पातून राजूरकरांसाठी पाणीपुरवठा योजना आणली आहे.राजुर हे तीर्थक्षेत्र आणि बाजारपेठे विकासाचे प्रमुख केंद्र बनत असून भविष्यात युवकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होण्यास मदत होईल.जलजीवन योजनेअंतर्गत सर्वात जास्त निधी भोकरदन तालुक्यात आणला असून भविष्यात श्रीक्षेत्र राजुरसाठी अधिकाधिक पायाभूत सुविधा निर्माण करणार असल्याचे मते ना.दानवे यांनी व्यक्त केले.यावेळी ना.दानवे यांच्या हस्ते मागील पाच वर्षांत केलेल्या विकास कामाची पोचपावती म्हणून पंचवार्षिक प्रगती कार्यअहवाल या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

**केंद्रीय मंत्री ना.दानवेंच्या माध्यमातून राजुरचा सर्वांगीण विकास-सरपंच,भाऊसाहेब भुजंग**

केंद्रीय रेल्वेमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांचे खंबीर नेतृत्व आणि विकासात्मक दूरदृष्टी,आ. संतोष दानवे,आ.नारायण कुचे यांच्या मार्गदर्शनामुळे राजूर नगरीचा सर्वांगीण विकास होण्यास मदत झाली असल्याचे मत सरपंच भाऊसाहेब भुजंग यांनी व्यक्त केले. ना.दानवें यांच्या नेतृत्वाखाली मागील पाच वर्षात विविध विकासकामे खेचून आणल. पाणी पुरवठा योजना,गावअंतर्गत सिमेंट रस्ते,नवीन वस्तीत विद्युत जोडणी,घरोघरी नळ कनेक्शन,आरोग्य सुविधा, शिक्षण,मागासवर्गीय समाजासाठी स्मशानभूमी,त्याचप्रमाणे जलशुद्धीकरण केंद्र यासारख्या विविध विकास योजना राबविण्यात आल्या आहेत.म्हणून ना.दानवेंच्या माध्यमातून राजुरचा सर्वांगीण विकास होतअसल्याचे मत सरपंच भुजंग यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमास या कार्यक्रमास सरपंच सुदाम ढवळे, साहेबराव ठोंबरे, राजू पाटील होलगे, मुन्ना शेठ शेखावत रावसाहेब ढवळे, अशोक ढवळे, सिन्नस ढवळे, विठ्ठल शेठ इंगेवार, मिटकरी साहेब ,जगन्नाथ थोटे, कौतिकराव लहाने, कृष्णा ढवळे,सुदाम पिंपळे, दत्ता भूमकर ,नवनाथ फुके, देवराव जगताप, किशोर कढवणे,रामेश्वर पाटील नागवे, गजानन साखरे,मनोहर घायाळ, माधवराव नागवे, कैलास टोम्पे, बालाजी जगताप, पिंपळे बापू, जगन ठोंबरे, संतुकराव ठोंबरे, अशोक गायके, उत्तम रेवगुडे, गणेश पुंगळे, भगवान सुद्रीक, सोमीनाथ पुंगळे यासह अनेक जण उपस्थित होते.




**शेवटच्या घटकांपर्यंत विकास पोहचविणार– आ .नारायण कुचे**

श्रीक्षेत्र राजुर हे मराठवाड्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असल्याने येथे हजारो भाविक दर्शनासाठी येतात .त्यामुळे पुढील तीस वर्षांचे नियोजन करून ग्रामपंचायत माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत विकास पोहचविणार असल्याचे मत आमदार नारायण कुचे यांनी व्यक्त केले .पुढे बोलताना आ .कुचे म्हणाले की आम्ही केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या विचारांचे पाईक आहोत .ना .दानवेंच्या दूरदृष्टीपणामुळे मतदारसंघाचा विकास झाला आहे . आरोग्य, शिक्षण,वीज,रस्ते प्रश्न मार्गी लागत आहेत .सर्व रस्ते श्रीक्षेत्र राजूरला जोडल्यामुळे दळणवळणास गती मिळत आहे . महाराष्ट्रात कुठल्याच ग्रामपंचायतीला मिळाला नाही इतका निधी राजूर ग्रामपंचायतीला प्राप्त झाला आहे .त्यामुळे ग्रामपंचायतच्या माध्यमातून शेवटच्या घटकांपर्यंत विकास पोहोचविणार असल्याचे मत आ . कुचे यांनी व्यक्त केले .

**पायाभूत सुविधा निर्माण करणार–आ .संतोष दानवे**

राजुर हे तीर्थक्षेत्र असल्याने येथे भाविकांची नेहमीच वर्दळ असते .जलजीवन अभियानाच्या माध्यमातून राजूरकरांचा पाहण्याचा प्रश्न सुटण्यास मदत झाली आहे .जलशुद्धीकरण केंद्रातून नागरिकांना शुद्ध पाणी उपलब्ध होणार आहे .वीज, पाणी, रस्ते,आरोग्य आणि शिक्षणया माध्यमातून नागरिकांस पायाभूत सुविधा निर्माण करून देणार असल्याचे प्रतिपादन आमदार संतोष पाटील दानवे यांनी केले .८३ गावांमध्ये शंभर कोटीहुन अधिक निधी मंजूर केल्याचे त्यांनी सांगितले 'हर घर जल'आणि 'हर हर बिजली' या योजनेअंतर्गत भोकरदन–जाफ्राबाद तालुक्यासाठी १४१ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे . राजुर हे तीर्थक्षेत्र असल्याने येथे भाविकांची नेहमीच वर्दळ असते .त्यामुळे राजूर येथील बाजारपेठ नव्याने उदयास येत असून व्यवसाय,दळणवळण आणि रोजगार निर्मिती होण्यास मदत होत आहे . श्रावण बाळ,विधवा माता आणि दिव्यांग यांच्यासाठी अनेक योजना प्रभावीपणे राबविल्या जात असल्याचे मत आमदार संतोष दानवे यांनी व्यक्त केले .

**विविध विकासाभिमुख योजनांचे भूमिपूजन व लोकार्पण–**

केंद्रीय रेल्वेमंत्री रावसाहेब पाटील यांच्या हस्ते राजूर ग्राम संसद कार्यालयाअंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध विकास कामाचे भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले . यामध्ये जलजीवन अभियानांतर्गत राजूर शहरासाठी पाणीपुरवठा योजनेसाठी ११ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला .स्थानिक विकास निधीतून मस्जिद रोड सिमेंट रस्ता व भूमिगत नाली बांधकामासाठी १० लक्ष रुपयांचा निधी मंजूर,ग्रामपंचायत माध्यमातून पंधराव्या वित्त आयोग योजनेतून जलशुद्धीकरण केंद्राचा शुभारंभ, तसेच आमदार स्थानिक विकास निधीतून ११ लक्ष रुपये सिमेंट रस्त्यासाठी मंजूर,जिल्हा परिषद शाळेसाठी सोलर प्लॅन्टचे उद्घाटन यासारख्या अनेक विकास कामाचा शुभारंभ ना .दानवें यांच्या हस्ते करण्यात आला .



# रब्बी हंगामासाठी प्रमाणित बियाणे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील सावळदबारा व विविध देव्हारी, पळसखेडा, टिटवी व सावळदबारा गावातील शेतकरी सोयगाव कृषी विभागाच्या वतीने यांचे मार्फत रब्बी हंगामास सुरुवात झाल्याने ज्वारी ,मका ,हरभरा इत्यादी पिकांची लागवड सुरु झाल्याने तालुका कृषी अधिकारी कार्यालय सोयगाव यांचेमार्फत कृषी सेवा केंद्र सोयगाव येथे उपलब्ध असलेले प्रमाणित बियाणे उचल करण्यास सुरुवात झाली आहे. आज दिनांक २२/१०/२२ शनिवार रोजी ऑक्टोंबर अखेर हरभरा या पिकाचे प्रमाणित बियाणे शेतकऱ्यांनी उचलण्यात आले असून सोयगाव तालुक्यातील व सावळदबारा परिसरातील इच्छुक शेतकरी यांनी देखील तात्काळ या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन तालुका कृषी अधिकारी सोयगाव एस.जी. वाघ यांनी केले आहे . सदरील बियाणे घेण्यासाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालय यांचे मार्फत परवाना घेणे बंधनकारक असून लाभार्थी शेतकऱ्याच्या नावावर जमीन असणे आवश्यक आहे .तालुक्यात कृषी सेवा केंद्र सोयगाव येथे हरभरा या पिकाचे बियाणे उपलब्ध असून प्रती पिशवी (३० किलो )अनुदान वगळता १३५० रुपये किंमत यावेळी सोयगाव कृषी अधिकारी एस.जी. वाघ,कृषी पर्यवेक्षक हेमंत देशमुख, ए.एस.महाजन बी.टी.एम सोयगाव, कृषी सहाय्यक मानसिंग भोळे,सरपंच, उपसरपंच, पो.पाटील,हरभरा प्रमाणीत घेणारे शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

